# सामर्थ्यशाली परमेश्वर आपल्यापुढे प्रगट झाला

माझ्याकडे काही शास्त्रभाग लिहीलेले आहेत, की मला त्यांतून तुमच्याशी बोलण्यास आवडेल; आणि मी विश्वास करतो की परमेश्वर आपले हे दुर्बल प्रयत्न आशीर्वादीत करील.

2 आता, पुष्कळ लोकं आश्चर्यचकित होतात की का आपण इतके विलक्षण आणि आवाज करणारे आहोत. तुम्हाला ठाऊक आहे, ही एक वेगळ्या प्रकारची—ची सभा आहे, त्या पेक्षा जी लोकं नेहमी पहात आलेली आहेत. आणि, सामान्यपणे, सर्व गोष्टी एक प्रकारे पूर्ण निश्चित केलेल्या स्वरुपात असतात. परंतु जेव्हा आपण ह्या सभेत येतो, जो आजपर्यंत इतक्या वर्षांपासून माझा विशेषाधिकार आहे ह्या सभांना सुरुवात झाल्यापासून, आणि आम्हाला हे ठाऊकही नव्हते की आम्ही त्या करणार आहोत. आम्ही केवळ येतो आणि आम्हाला समर्पित करतो. तीच एक गोष्ट आहे जी करणे आम्हाला ठाऊक आहे. आणि देव बाकीच्या गोष्टी करतो. तेच आम्हाला एका विशिष्ट प्रकारचे लोक बनवते.

3 त्या दिवशी कोणीतरी म्हणाले, “तुम्हाला ठाऊक आहे तुम्ही लोकं खरोखरीच चक्रम व्यक्ती आहात.”

मी म्हणालो, “हो, मला—मलाही वाटते आम्ही तसेच आहोत.”

4 आणि मला एका सभेची आठवण येते. भाऊ ट्रॉय मला एका छोट्या जर्मन मनुष्याची एके वेळची गोष्ट सांगत होते की ज्याने म्हटले की त्याला पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा मिळाला. आणि दुसऱ्या दिवशी, एका दुकानात जेथे तो काम करीत होता, तो त्याचे हात वर करीत असे आणि प्रभूची स्तुती करीत असे आणि अन्य भाषेत बोलत असे आणि असेच करीत असे, भयंकर. आणि शेवटी, त्याचा मालक जवळ आला आणि म्हणाला, “हैनी, तुला काय झाले आहे?”

5 त्याने म्हटले, “ओह, माझे तारण झाले आहे.” त्याने म्हटले, “माझे अंतःकरण अगदी आनंदाने भरुन वाहत आहे.”

6 त्याने म्हटले, “बरे, तू नक्कीच खाली त्या वेड्यांच्या समुहासह तेथे गेला असणार.”

7 त्याने म्हटले, “होय. परमेश्वराचा गौरव होवो!” म्हणाला, “ह्या वेड्यांबद्दल प्रभूची स्तूती असो.” त्याने म्हटले—त्याने म्हटले, “तुझी गाडी घे, रस्त्यावर ये.” म्हटले, “तु त्यांतून सर्व नट बाहेर काढ, तूझ्याकडे काहीच राहणार नाही परंतु एक पत्र्यांचा ‘ढीग.’” आणि ते केवळ...ते अगदी बरोबर आहे, तुला माहीत आहे.

8 एके दिवशी, कॅलिफोर्नियामध्ये, मी लॉस एन्जल्सच्या रस्त्याने जात होतो, आणि मी पाहिले एका मनुष्याच्या छातीवर एक चिन्ह होते, आणि *येथे*. आणि त्याने म्हटले, “मी ख्रिस्तासाठी एक वेडा आहे.” आणि सर्वजण त्याच्याकडे पहात होते. आणि मी त्यांना त्याच्याकडे वळून पाहताना पहात होतो, जेव्हा तो तेथून जात असे. आणि मी विचार केला की मी ही त्यांच्यासारखे करीन. आणि त्याच्या...पाठीवर, त्याने म्हटले, “तुम्ही कोणासाठी वेडे आहात?” होय. मला वाटते की आपण सर्व विलक्षण प्रकारचे आहोत, एक दुसऱ्यासारखे, तुम्हाला माहीत आहे.

9 परंतु तुम्हाला माहीत आहे, हे जग अशा प्रकारच्या चाकोरीबध्द जीवनात गुंतले आहे, एखादी वेगळी गोष्ट तिला इतके विलक्षण करते, की लोकं विचार करु लागतात की हे काहीतरी चुकीचे आहे. आणि विलक्षणपणे देवाला काहीतरी नेहमीपेक्षा वेगळे करावे लागते, ह्यासाठी की लोकांना पुन्हा बायबलकडे वळवावे.

10 मी कल्पना करु शकतो की नोहा त्या प्रकारचा एक—एक वेड लागलेला व्यक्ती होता, त्या वैज्ञानिक युगासाठी जेथे तो रहात होता, कारण ते सिध्द करु शकत होते की आकाशामध्ये पाणी नव्हते. परंतु देवाने म्हटले तेथे काही तसे असतील. म्हणून, नोहा, प्रचार करीत होता आणि त्यावर विश्वास ठेवीत होता, तो एक वेड लागलेला व्यक्ती बनला.

11 आणि मी कल्पना केली की जेव्हा मोशे खाली मिसरामध्ये गेला, तो फारोसाठी एक—एक वेड लागलेला व्यक्ती होता. परंतु लक्षात ठेवा, फारो देखील त्याच्यासाठी एक वेड लागलेला व्यक्ती होता. म्हणून त्यांनी…आपल्याला ते समजते.

12 अगदी येशूला एक बंडखोर गणले गेले. ते बरोबर आहे. मार्टीन लुथर, कॅथलिक चर्चसाठी, एक वेड लागलेला व्यक्ती होता. आणि जॉन वेसली ॲग्लीकनसाठी एक वेड लागलेला व्यक्ती होता. म्हणून, तुम्हाला माहीत आहे, हा—हा दुसऱ्या वेड लागलेल्या व्यक्तीचा समय होता. तुम्हाला तसे वाटत नाही काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—सम्पा.] परंतु तुम्हाला माहीत आहे, तेथे नट असण्याअगोदर, तेथे प्रथम, खीळ असणे आवश्यक आहे, त्याला घट्ट धरुन ठेवण्यासाठी.

13 म्हणून, तुम्हाला ठाऊक आहे, नोहा, एक वेड लागलेला व्यक्ती असल्याकारणाने, त्याने…तो नट काढा, तर त्याद्वारे बोल्टही खेचला जातो, काही गोष्टी एकत्र खेचल्या जातात, आणि काही गोष्टी एकत्र पकडल्या जातात. म्हणून, नोहा त्या सर्व विश्वास ठेवणाऱ्यांना न्यायातून, तारुमध्ये खेचू शकला, एक वेड लागलेला व्यक्ती असल्याकारणाने.

14 आपल्याला कळते, की, मोशेने त्याच्या लोकांना मिसरांतून काढले, एक वेड लागलेला व्यक्ती असल्याकारणाने. ते बरोबर आहे.

15 मला वाटते आपल्याला आता एक वेड लागलेला व्यक्तीची गरज आहे, वधूला मंडळीतून बाहेर काढण्यासाठी. आता आपल्याला काहीतरी हवे आहे, दूसरे एक, ह्यासाठी आपण एक अतिशय विलक्षण प्रकारचे लोकं व्हावे. आणि मला वाटते, आज रात्री, जर प्रभूची इच्छा असली, तर मी ह्याविषयी काही वचने वाचण्याचा प्रयत्न करीन. आणि काही क्षण तुमच्याशी बोलेन, आणि तुम्हाला दाखविण्याचा प्रयत्न करीन की का आपण असे विलक्षण लोक आहोत.

16 आपण आता वचनांकडे वळूया, फिलिप्पैकरांस पत्र, 2 रा अध्याय, 1–8, आणि दूसरे करिंथकरांस पत्र 3:6. आणि आपण वाचूया, कारण आपण देवाच्या वचनावर विश्वास ठेवतो.

17 आणि आता आपणही वाचण्याआधी, आपली मस्तके प्रार्थनेसाठी झुकवूया.

18 कृपाळू स्वर्गीय पित्या, आम्ही निश्चितच विशेषाधिकार असलेले लोक आहोत, आज रात्री ह्या युगात राहात असताना, आणि त्या गोष्टी समजण्यासाठी ज्या आम्ही घडताना पहातो, आणि जाणावे की समय अगदी जवळ आला आहे, जेव्हा येशू त्याच्या मंडळीसाठी येईल. ओह, प्रभू, त्याने आमची अंतःकरणे थरथरत आहेत! आणि जसे आम्ही ही पाने मागे ओढीत आहोत, आज रात्री, आम्ही प्रार्थना करतो की तू आम्हाला ह्या वचनांतून

संदर्भ देशील. आणि पवित्र आत्मा आमच्या हृदयांना त्या गोष्टी प्रगट करो ज्या चांगल्या आणि देवाला संतोषकारक असतील. आम्ही येशूच्या नावाने मागतो. आमेन.

19 तुम्हाला ठाऊक आहे, विश्वास ठेवा मी तुम्हाला काही गोष्टी करण्यास सांगेन. मी—मी सहसा काही चमत्कारिक गोष्टी करण्यास सांगतो, आणि माझी आशा आहे की मी तुम्हाला फार चमत्कारिक गोष्टी सांगत नाही. परंतु जेव्हा आपण प्रतिज्ञा घेऊन झेंड्यावरील निष्ठा प्रगट करतो, आपण सर्व उभे राहतो. आणि—आणि जेव्हा झेंडा जवळून जातो, आपण उभे राहतो; जे आपण राहीलो पाहीजे. आणि आपण सलामी देण्यासाठी उभे राहातो. आपण वचन वाचत असता उभे राहूया, जर तुम्ही, 2 रे करिंथकरांस पत्र 3:6.

*त्यानेच...आम्हाला नव्या कराराचे सेवक होण्याकरिता समर्थ केले; तो करार लेखी नव्हे, तर आध्यात्मिक आहे; कारण लेख जिवे मारतो, परंतु आत्मा जीवंत करितो.*

*जिचा—जिचा लेख दगडावर कोरलेला असून जिचे पर्यवसन मृत्यूंत होत असे ती सेवा एवढी तेजस्वी होती की 'मोशेच्या तोंडाचे तेज' नाहीसे होत चालले असूनही इस्त्राएल लोकांना जर त्याच्या तोंडाकडे टक लावून पाहवेना.*

*तर आध्यात्मिक सेवा विशेषकरुन तेजस्वी होणार नाही काय?*

*कारण ज्या सेवेचा परिणाम दंडाज्ञा ती जर तेजोमय होती...तर जिचा परिणाम नीतिमत्व ती किती विशेषेकरुन अधिक तेजोमय असणार.*

*इतकेच नव्हे, तर जे तेजस्वी होते ते ह्या तुलनेत अपरंपार तेजापुढे तुलनेने हीनतेज ठरले.*

*नष्ट होत चाललेले जर तेजयुक्त आहे तर जे शाश्वत ते कितीतरी अधिक तेजस्वी असणार.*

*तर मग आम्हाला अशी आशा असल्यामुळे आम्ही फार धिटाईने बोलतो.*

*इस्त्राएल लोकांनी जे नाहीसे होत चालले होते त्या तेजाकडे एकसारखी दृष्टी लावू नये म्हणून मोशे आपल्या मुखावर आच्छादन घालीत असे तसे आम्ही करीत नाही.*

*परंतु त्यांची मने कठीण झाली, कारण जुना करार वाचून दाखवण्यात येतो तेव्हा तेच आच्छादन आजपर्यंत तसेच न काढलेले राहते; ते ख्रिस्तामध्ये नाहीसे होते.*

*आजपर्यंत मोशेचा ग्रंथ वाचून दाखविण्यात येतो तेव्हा त्यांच्या अंतःकरणावर आच्छादन राहते.*

*परंतु त्यांचे अंतःकरण प्रभूकडे वळले म्हणजे आच्छादन काढले जाते...*

*प्रभू आत्मा आहे, आणि जेथे प्रभूचा आत्मा आहे तेथे मोकळीक आहे.*

*परंतु आपल्या मुखावर आच्छादन नसलेले, आपण सर्वजण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाडीत आहो आणि प्रभू जो आत्मा, त्याच्याद्वारे तेजस्वीतेच्या परंपरेने, आपले रुपांतर होत असता आपण त्याच्याशी समरुप होत आहो.*

20 आणि फिलिप्पैकरांस पत्र 2, आपण हे वाचूया, 1 ल्या वचनापासून सुरुवात करुया, आणि 8 व्या वचनापर्यंत वाचूया.

*ह्या—ह्यावरुन ख्रिस्ताच्या ठायी काही आश्वासन, प्रीतीचे…काही सांत्वन, आत्म्याची काही सहभागिता, काही कळवळा व करुणा ही जर आहेत.*

*तर तुम्ही समचित्त व्हा, एकमेकांवर सारखीच प्रीति करा आणि एकजीव होऊन एकचित्त व्हा, अशा प्रकारे माझा आनंद पूर्ण करा.*

*तट पाडण्याच्या अथवा पोकळ डौल मिरवण्याच्या बुध्दीने काहीही करु नका, तर लीनतेने एकमेकांना आपणापेक्षा श्रेष्ठ माना;*

*तुम्ही कोणीही आपलेच हीत पाहू नका, तर दुसऱ्याचेही पाहा.*

*अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो*

*तो देवाच्या स्वरुपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही,*

*तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरुपाचे होऊन दासाचे स्वरुप धारण केले.*

*आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट होऊन त्याने मरण; आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले, येथपर्यंत आज्ञापालन करुन त्याने स्वतःला लीन केले.*

21 आपण प्रार्थना करुया.

22 स्वर्गीय पित्या, हे महान वचन जे, आज रात्री, तुझ्या पवित्र प्राधिलेखातून वाचले गेले आहे, आमच्या अंतःकरणासाठी इतके वास्तविक कर, की आम्ही येथून जाऊ जसे अम्माऊस येथून जाताना, ते म्हणत होते, “तो वाटेने आपल्याबरोबर बोलत होता व शास्त्राचा उलगडा करीत होता तेव्हा आपल्या अंतःकरणाला आतल्या आत उकळी येत नव्हती काय?” हे आम्ही येशूच्या नावात मागतो. आमेन.

तुम्ही बसू शकता.

23 आता हे एक विलक्षण वचन आहे, परंतु माझ्या मते ते ह्या प्रसंगासाठी एकदम योग्य आहे. मी ह्या विषयावर बोलू इच्छितो: *सामर्थ्यशाली देव आमच्यासमोर प्रगट झाला*.

24 आता, तेथे मनुष्य होता, मनुष्याच्या हृदयात एक भूक होती, हे शोधण्यासाठी की तो कोठून आला आणि येथे त्याला असण्याचे काय कारण आहे, आणि तो कुठे जात आहे. तेथे केवळ एकच आहे जो उत्तर देऊ शकतो, तो आहे ज्याने त्याला येथे आणले आहे. आणि मनुष्याची देवाला पाहण्याची नेहमीच इच्छा होती.

25 जुन्या करारात, आपण पहातो की देव, स्वतःला अविश्वासणाऱ्यांपासून गुप्त ठेवीत होता, देवाकडे लोकांबरोबर व्यवहार करण्याचा एक वेगळाच मार्ग आहे. तो स्वतःला अविश्वासणाऱ्यांपासून लपवतो आणि स्वतःला विश्वासणाऱ्यांस प्रगट करतो. देव तसे करतो. येशू पित्याचे आभार मानतो, की, त्याने ह्या गोष्टी ज्ञानी आणि विचारवंतांपासून गुप्त ठेवल्या, आणि बाळकास प्रगट केल्या. म्हणून, आपण पहातो की देव कधीच त्याच्या स्वभावामध्ये बदलत नाही, आणि तो नेहमी त्याचे कार्य एकसारखेच करतो. आपण हे मलाखी 3 मध्ये पहातो, की तो म्हणतो, “मी देव आहे, आणि मी कधीही बदलत नाही.” म्हणून, तो सदैव, एकाच नियमाने कार्य करतो.

26 आता आपण बायबलच्या सर्वात जुन्या पुस्तकातील एक घेत आहोत. जेव्हा ईयोब, त्याच्या दिवसातील नीतीमान मनुष्यांमधील एका देवाच्या नियमांतील एक परिपूर्ण मनुष्य, एक सेवक, थोर, सन्माननीय सेवक, देव देखील म्हणाला, “त्याच्यासारखा ह्या पृथ्वीवर,

कोणी नाही.” परंतु...त्याची इच्छा झाली की देवाला एकदा पहावे. त्याला ठाऊक होते की तेथे देव आहे, आणि त्याला वाटले की त्याला देवाला पहाणे आवडेल, किंवा, एकतर, त्याच्या घरी जावे. आणि दरवाजा ठोठावा, आणि म्हणावे, “मला तुझ्याबरोबर बोलण्यास आवडेल.” बसावे, त्याच्यासह बोलावे, जसे आपण एकमेकांशी बोलतो.

27 आपल्याला एक समज आहे. हेच कारण आहे आम्ही ह्या सभांमध्ये आहोत, जेथे आम्ही एकत्र येतो आणि—आणि आपले विचार प्रगट करतो. आणि—आणि आपण एकमेकांना चांगल्या प्रकारे समजून घेतो, चांगल्याप्रकारे, जेव्हा आपण एकमेकांशी ह्या गोष्टींविषयी बोलतो. आणि सेवक तसे करतात. जीवनातील सर्वच लोकं ते करतात, गोष्टींवर बोलतात.

28 आणि, ईयोब, देव त्याच्यासाठी इतका खरा होता, त्याची शोधण्याची इच्छा होती जर तो जाऊ शकत नव्हता, त्याचा दरवाजा ठोठावू शकत नव्हता, आणि—आणि त्याच्याशी मुलाखत करु शकत नव्हता.

29 परंतु आपण पहातो की देव त्याच्याशी बोलला, परंतु तो आच्छादीत होता. तो एका वावटळीच्या स्वरुपात आच्छादीत होता. आणि त्याने ईयोबास मर्दाप्रमाणे त्याची कमर बांधण्यास सांगितले; तो त्याच्याशी, मनुष्याप्रमाणे, बोलणार होता. आणि तो वावटळींतून खाली आला आणि—आणि ईयोबाशी बोलला आणि त्याने त्या वावटळीद्वारे स्वतःला ईयोबास प्रगट केले, तरीही त्याने त्याला तंतोतंत पाहीले नाही. तो केवळ वारा वाहताना आणि झाडांमध्ये सभोवती फिरताना ऐकू शकत होता. आणि वावटळीतून आवाज आला, परंतु देव त्या वावटळीत आच्छादीत होता.

30 आपण, खाली आफ्रिका, साऊथ आफ्रिकेत पहातो, ते एक शब्द *अमोयाह* वापरतात, ज्याचा अर्थ, “एक अदृश्य शक्ती.”

31 आणि ही अदृश्य शक्ती, वावटळीमध्ये जिला एक ऐकू येण्याजोगा आवाज होता. ती ईयोबाशी बोलली, तरीही त्याने त्याचे रुप कधीच पाहिले नाही. परंतु तो त्याच्याशी वावटळीद्वारे आच्छादीत होता.

32 आपण बायबलमधील जुन्या करारांतील महान संदेष्ट्यांपैकी एक पहातो, मोशे देवाचा निवडलेला, खास, पूर्वनिर्धारित सेवक, त्याची देखील त्याला भेटण्याची इच्छा होती. तो त्याच्याशी इतका जवळ होता, आणि त्याने त्याच्या महान गुढ हातांनी घडताना व करताना कित्येक गोष्टी त्याच्यासमोर पाहिल्या होत्या ज्या केवळ देवच करु शकतो. एकदा त्याची त्याला पाहण्याची इच्छा झाली, आणि देवाने त्याला म्हटले, “जा खडकावर उभा रहा.”

33 आणि खडकावर उभे राहून, मोशेने त्याला जवळून जाताना पाहिले. त्याने त्याची पाठ पाहिली. आणि त्याने म्हटले, “ती एका मनुष्यासारखी दिसली, मनुष्याच्या पाठीसारखी.” तरीही त्याने देवाला पाहीले नाही. त्याने फक्त देवाचे आच्छादन पाहिले.

34 बायबल सांगते, “कोणीही मनुष्याने देवाला कधीही पाहिले नाही, जो एकुलता एक जन्मलेला देवपित्याच्या उराशी असतो त्याने त्याला प्रगट केले आहे.” म्हणून मोशेने त्याला आच्छादित असे पाहिले, एका मनुष्यासारखे. आपल्याला समजते की जुन्या करारातील यहोवा हा नविन करारातील येशू होता.

35 आणि—आणि डॉ. स्कोफिल्ड येथे, आपण पहातो की, त्याचे शब्द, “रुप” बदलणारा. ग्रीक मध्ये, आपण एक शब्द पहातो *एन मॉर्फी*, ज्याचा अर्थ, “जे अदृश्य ते दृश्य केले होते.” अशी गोष्ट जी...आपल्याला माहीत आहे ती तेथे आहे. ती असू शकते...

पाहू शकत नाही, परंतु तरीही आपल्याला ठाऊक आहे की ती तेथे आहे. आणि जेव्हा त्याने त्याचे रुप बदलले, *एन मॉर्फीचा*, ज्याचा अर्थ हा की तो दैवीपासून नैसर्गिक झाला.

36 आणि त्याने केवळ त्याचा मुखवटा बदलला, दुसऱ्या शब्दांत, ते एका नाटकाप्रमाणे आहे. तो भूमिका करीत होता. आणि ग्रीकमध्ये, जेव्हा ते त्यांचे मुखवटे बदलत कदाचित... एका कलाकाराने कित्येक पात्रांची भूमिका केली असेल.

37 आणि माझी मुलगी, जी येथे हजर आहे, त्यांचे त्यांच्या शाळेत एक—एक नाटक होते. आणि मला माहीत आहे एका मुलाने चार जणांची भूमिका केली, परंतु तो व्यासपीठाच्या मागे जाई आणि त्याचा—त्याचा मुखवटा बदली, मग बाहेर येई, दुसऱ्या भूमिकेची नक्कल करण्यासाठी.

38 आता जर तुम्ही जुन्या करारांतील मसीहा कसा असणार ह्याविषयी भविष्यवाण्या पाहिल्या, तर तुम्ही त्यांची येशूच्या जीवनाबरोबर तुलना करु शकता; आणि तुम्हाला येशू कोण होता हे तंतोतंत सापडेल. तो केवळ एक सामान्य मनुष्य नव्हता. तो देव होता. *बहुरुपी*. तो दैवी स्वरुपातून—तून, मनुष्याच्या नैसर्गिक रुपात बदलला गेला. तरीही, तो देव होता, देहात प्रगट झाला होता, मानवी रुपाने झाकलेला, मांसाने झाकलेला.

आणि तुम्ही जुन्या करारात पहा.

39 मला—मला—मला ठाऊक आहे की आज रात्री, मी एका मिश्र श्रोत्यांशी बोलत आहे, जे जगाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेले आहेत. आणि आपण येथे शोधून काढण्यासाठी आलो आहोत. आपण—आपण काय आहोत. आपण—आपण काय करीत आहोत? आपण काय आहोत? आपण कुठे जात आहोत? काय घडत आहे? ह्या सर्वांचा काय अर्थ आहे?

40 आणि आता आपण येथे, पहातो, की, तुम्ही यहुदी पुरुष आणि स्त्रीया, आणि मंदिरातील—तील रब्बी, मागील दिवसात, जर त्यांनी बायबलकडे लक्ष दिले असते, परंपरेऐवजी त्यांतील भविष्यवाण्यांवर, तर त्यांनी, येशू कोण होता हे ओळखले असते. त्यांनी त्याला कधीच बालजबूल असे म्हटले नसते. त्यांनी त्याला कधीच वधस्तंभावर खिळले नसते. परंतु ते सर्व घडणार होते. तो नाटकाचा भाग होता. आणि ह्या कारणामुळे, त्यांना आंधळे करण्यात आले.

41 हे जणूकाही पुष्कळ तुम्हा पुरुष, स्त्रीया सारखे, जे येथे आजरात्री आहेत, कदाचित ते माझ्या वयाचे किंवा थोडेसे मोठे असतील. तुम्हाला आठवते, येथे अमेरिकेत, खूप वर्षांअगोदर, आधी चायनीस...माझ्या भावा, त्याची येथे ओळख देत आहे, ते माझ्या मनात आले जेव्हा मी त्याच्याशी बोलत होतो. कसे ते करीत असत...ते इंग्रजी बोलू शकत नव्हते, आणि ते—ते धोब्याचे काम करीत असत. आणि तुम्ही त्याच्याकडे धुतलेले कपडे घेण्यास गेला. ते—ते चीनी धुलाई करणारे एक टॅग घेत असत, आणि ते एका विशिष्ट प्रकारे फाडत तुमच्याकडे टॅगचा एक भाग ठेवीत, तो दुसरा भाग ते घेत असत. परंतु जेव्हा तुम्ही तुमचे कपडे परत घेण्यास याल, ते दोन पेपरचे भाग भिडस्त असले पाहिजे. आणि जर ते तंतोतंत जुळले नाही...तुम्ही त्याची कुठल्याही प्रकारे नक्कल करु शकणार नाही, कारण त्याच्याकडे एक तुकडा आहे आणि दुसरा तुकडा तुमच्याकडे. आणि जर त्याची नक्कल केली...तर मग तुम्हाला जे तुमचे आहे त्याचा दावा करण्याचा अधिकार आहे. आणि मग तुम्हाला जे तुमचे आहे ते मिळते, जर तुमच्याकडे त्या कराराचा दुसरा भाग असेल.

42 म्हणून, आज रात्री, जेव्हा आपल्याकडे त्या कराराचा दुसरा भाग आहे. जेव्हा देवाने त्याच्या पुत्राला कलवरीवर दोन भागात फाडले, शरीर अर्पणासाठी घेतले, आणि आत्मा

आपल्याकडे खाली पाठविला; जो एकदा येशू, ह्या मनुष्यामध्ये राहात होता. तोच देव आज रात्री आच्छादित आहे, पवित्र आत्म्याच्या स्वरुपात. ते दोन तुकडे एकत्र आले पाहीजे, तेव्हा तुम्ही त्या कराराचा भाग बनता. देवाने हे केले, मनुष्याला अधिक ओळख देण्यासाठी, जेव्हा त्याने स्वतःला मनुष्य केले.

43 काही वर्षांअगोदर, मी एक गोष्ट वाचत होतो. आणि ह्या गोष्टीमध्ये म्हटले आहे, एका महान, थोर राजा…मी त्याचे नाव आताच विसरलो. मी ही गोष्ट सांगण्याचा विचार केला नव्हता. ती, जरी काल्पनीक आहे, परंतु ती आपल्याला त्या मुद्याकडे नेते जी आपल्याला त्याची पार्श्वभूमी देते ज्यावर आज आपण बोलू इच्छितो. हा राजा, तो इतका थोर राजा होता आणि इतके महान प्रेम त्याच्या प्रजेवर करणारा होता, की एके दिवशी, त्याचे—त्याचे संरक्षक आणि त्याचे राजघराण्यांतील व्यक्ती ह्यांच्यासमोर, तो म्हणाला, "आज, तुम्ही मला शेवटचं पाहता, खूप वर्षांकरिता."

44 आणि त्याचे रक्षक आणि त्याचे राजघराण्यांतील व्यक्ती त्याला म्हणाले, "भल्या राजा, तू तसे का म्हणालास? तू परदेशी कोठेतरी, परदेशी बनण्यास जात आहेस का?"

45 त्याने म्हटले, "नाही. मी येथेच राहणार आहे. बरे," म्हणाला, "मी माझ्या प्रजेमध्ये जाणार आहे. मी एक शेतकरी बनणार आहे. मी लाकडे तोडणाऱ्याबरोबर लाकडे तोडणार आहे. मी नांगरणाऱ्याबरोबर जमिन नांगरणार आहे. मी द्राक्षे खुडणाऱ्यांबरोबर द्राक्षे खुडणार आहे. मी त्यांच्यातील एक बनणार आहे, ह्यासाठी मला अधिक कळावे की ते काय करीत आहे. आणि मी त्यांच्यावर प्रेम करतो. आणि मी त्यांना व्यक्तिशः अधिक चांगल्या प्रकारे जाणू इच्छितो. ते मला ओळखणार नाही. परंतु, तरीही, मी त्यांना तशाप्रकारे जाणू इच्छितो."

46 आणि दुसऱ्या सकाळी, जेव्हा त्याचे प्रतिनिधी, सर्व त्याच्या लोकांनी, किंवा ते जे राजवाड्यात होते, त्याला पाहिले, त्याचा मुकूट काढला आणि त्याच्या आसनावर, राजासनावर ठेवला; आणि त्याचा झगा काढला, आणि एका शेतकऱ्याचा पोषाख चढवला, सामान्य लोकांमध्ये चालत गेला.

आता, ह्या लहान गोष्टीत, आपल्याला देवाविषयी कळते.

47 त्यांनी राजाला म्हटले, "महाराज, आम्हाला तू हवा आहेस, आम्ही तुझ्यावर प्रेम करतो. आमची—आमची इच्छा आहे की तू राजा असावे." परंतु त्याची इच्छा होती की त्यांच्यातील एक बनावे, त्यांना अधिक चांगल्या रीतिने ओळखावे, ह्यासाठी की त्यांनी त्याला अधिक ओळखावे, की तो कोण होता? ते त्यांना प्रगट करील की तो वास्तवात कोण होता.

48 आणि तेच देवाने केले. त्याने—त्याने स्वतःला यहोवा देवापासून बदलले, आपल्यातील एक बनावे, ह्यासाठी की त्याने त्रास सहन करावा, त्याने मरणाची चव घ्यावी, त्याला समजावे की मरणाची नांगी काय होती, आणि मरणाचा दंड त्याच्या स्वतःवर घ्यावा. त्याने त्याचा—त्याचा मुकूट आणि त्याचा झगा काढून बाजूला ठेवला, आणि तो आपल्यातील एक बनला. त्याने लहानांबरोबर पाय धूतले. तो गरीबांसह—सह, तंबूत राहिला. तो जंगलात आणि रस्त्यामध्ये जे वंचित लोक होते त्यांच्याबरोबर झोपला. तो आपल्यामधील एक झाला, ह्यासाठी की त्याने आम्हाला अधिक चांगल्याप्रकारे जाणावे, आणि आपणही त्याला अधिक जाणावे.

49 आता, मला वाटते, ह्यात, आपल्याला समजते, त्याला स्वतःला बदलण्याद्वारे, त्याने काय केले. जर तुम्ही निरीक्षण केले, तो तीन पुत्रांच्या नावाने आला. तो मनुष्यांच्या

पुत्राच्या नावाने आला, आणि देवाच्या पुत्राच्या नावाने, आणि दाविदाच्या पुत्राच्या नावाने. तो मनुष्याचा पुत्र म्हणून आला.

50 आता, यहेज्केल 2:3 मध्ये, यहोवा, स्वतः यहेज्केलला, जो संदेष्टा, "मनुष्याचा पुत्र," असे संबोधतो.

51 *मनुष्याचा पुत्र* म्हणजे, "एक संदेष्टा." त्याला तशाप्रकारे यावे लागले की, अनुवाद 18:15 पूर्ण करण्यासाठी, जेथे मोशेने म्हटले, "तुझा देव परमेश्वर तुझ्यामधून म्हणजे तुझ्या भाऊबंदांतून माझ्यासारखा एक संदेष्टा तुझ्याकरिता उभा करिल." त्याने स्वतःला कधीच देवाचा पुत्र असे संबोधले नाही. त्याने स्वतःला, "मनुष्याचा पुत्र," संबोधले, कारण त्याला शास्त्रलेखाप्रमाणे यायचे होते. समजले? त्याला फाडलेल्या पेपरचे दोन तुकडे करायचे होते, जुन्या करारातील भविष्यवाणी आणि त्याचे स्वतःचे चारित्र्य, जे तंतोतंत एकसारखे असले पाहिजे. म्हणून तो, मनुष्याच्या पुत्राच्या स्वरुपात आला.

52 मग आपल्याला कळते, त्याचा मृत्यू, गाडले जाणे, आणि पुनरुत्थानानंतर, तो पेंटेकॉस्टच्या दिवशी, देवाचा पुत्र म्हणून; देव, तो आत्मा, पवित्र आत्म्याच्या स्वरुपात आला. तो काय करीत होता? तो स्वतःला बदलत होता, त्याच्या लोकांना एका वेगळ्या स्वरुपात प्रगट होत होता. जसे, पवित्र आत्मा जो देव आहे, तो मंडळी युगांमधून व्यवहार करण्यासाठी एक देवाचा पुत्र म्हणून, पवित्र आत्म्याच्या रुपात आला.

53 परंतु, एक हजार वर्षांच्या काळात, तो दाविदाचा पुत्र म्हणून, दाविद राजाच्या राजासनावर बसण्यासाठी येतो. त्याला दाविदाचे, राजासन घ्यावयाचे होते. तो आता पित्याच्या राजासनावर बसलेला आहे. आणि मग त्याने म्हटले, "मी जसा विजय मिळवून आपल्या पित्याबरोबर त्याच्या राजासनावर बसलो, तसा जो विजय मिळवतो त्याला मी आपल्या राजासनावर आपल्याबरोबर बसू देईन." म्हणून, तो, एक हजार वर्षांच्या काळात, तो दाविदाचा पुत्र असेल. ते काय आहे? तो देव, सदैव केवळ त्याचा—त्याचा मुखवटा बदलत आहे.

मी, माझ्या पत्नीसाठी, एक पति आहे.

54 तुम्ही पाहीले का? सुरफुनीकी स्त्री म्हणाली, "तुम्ही दाविदाचे पुत्र माझ्यावर दया करा." त्याने, त्याला काहीच फरक पडला नाही. तिला त्याला तसे संबोधण्याचा काहीच अधिकार नव्हता. तिचा त्याच्यावर दाविदाचा पुत्र म्हणून काहीच दावा नव्हता. तो होता… तो दाविदाचा पुत्र, यहुद्यांसाठी आहे. आणि आता तो आला…परंतु जेव्हा तिने त्याला, "प्रभू" म्हटले, तो तिचा प्रभू होता, तेव्हा तिला जे तिने मागितले ते प्राप्त झाले.

आता, अशाप्रकारे, तो केवळ स्वतःचे रुप बदलत आहे.

55 आता, माझ्या घरात, मी तीन वेगळा व्यक्ती आहे. माझ्या घरात माझी पत्नी माझ्यावर पती म्हणून अधिकार करते. माझी मुलगी जी बाहेर आहे, तिचा माझ्यावर एक पती म्हणून काही अधिकार नाही; मी तिचा पिता आहे. आणि माझा छोटा नातू तेथे आहे, मी त्याच्यासाठी आजोबा आहे, म्हणून त्याला मला पिता म्हणण्याचा अधिकार नाही. मी त्याचा पिता नाही. माझा मुलगा त्याचा पिता आहे. मी त्याचा आजोबा आहे. परंतु मी तोच व्यक्ती आहे.

56 आणि देव, तो काय करतो, त्या पिढीला, त्याच्या लोकांना स्वतःला प्रगट करण्यासाठी, केवळ स्वतःचे रुप बदलतो. आणि आज रात्री, आपण तेच पहाण्यासाठी येथे आहोत. कशाप्रकारे देव त्याच्या लोकांना ह्या समयात प्रगट करणार आहे? तो त्याचा मुखवटा बदलतो, तो त्याची भूमिका बदलतो, परंतु तो त्याची—त्याची प्रवृत्ती बदलत

नाही. तो केवळ त्याचा मुखवटा, एकापासून दुसऱ्यामध्ये बदलतो. तो हे त्याच्या लोकांना अधिक स्पष्टपणे प्रगट करण्यासाठी करतो, ह्यासाठी की त्यांनी ओळखावे की तो कोण आहे, आणि तो काय आहे.

57 इब्रीकरांस पत्र 1 ला अध्यायात, आपण वाचतो, "देव प्राचीन काळी अंशाअंशांनी व प्रकाराप्रकारांनी संदेष्ट्यांच्याद्वारे आपल्या पूर्वजांशी बोलला, परंतु ह्या काळाच्या शेवटी, त्याच्या पुत्राच्याद्वारे, येशूच्याद्वारे बोलला आहे."

58 आता, येशूने म्हटले, "संदेष्टे," जेव्हा तो येथे पृथ्वीवर होता, "ते देव होते. तुम्ही त्यांना 'देव' म्हणता, ज्यांच्याकडे देवाचे वचन येते. आणि वचन रद्द होऊ शकत नाही." त्याने म्हटले. म्हणाला, "तुम्ही त्याला कसे दोषी ठरवता, जेव्हा तो देवाचा पुत्र आहे?" पाहिले?

59 देवाचे वचन प्रत्येक युगामध्ये भागात वेगळे केले गेले, ते कसे असले पाहीजे, आणि येशू हा सर्व भविष्यवाण्यांची परिपूर्तता होता. "त्याच्यामध्ये देवपणाची पूर्णता मूर्तीमान वसते." ती त्याच्यामध्ये होती. तो तोच होता जो योसेफामध्ये होता. तो तोच होता जो एलीयामध्ये होता. तो तोच होता जो मोशेमध्ये होता. तो तोच होता जो दाविदामध्ये होता, एक नाकारलेला राजा.

60 त्याच्या स्वकीयांनी त्याला राजा म्हणून, नाकारले होते. आणि जेव्हा तो अंगणातून—तून बाहेर गेला, एक बुटका, पिडीत व्यक्ती जो सभोवती रांगत होता, त्याचे—त्याचे सरकार, त्याची प्रणाली त्याला आवडली नाही, आणि तो त्याच्यावर थुंकला. आणि रक्षकाने त्याची तरवार काढली, म्हणाला, "मी त्या कुत्र्याचे डोके उडवू का, ज्याने माझ्या स्वामी राजास शाप दिला?"

61 आणि दाविद, त्याला समजत नव्हते की तो त्या वेळेला काय करीत आहे, परंतु तो अभिषिक्त होता. आणि त्याने म्हटले, "त्याला एकटे सोडा. देवाने त्याला तसे करण्यास सांगितले आहे." आणि तो टेकडीवर चढून गेला आणि यरुशलेमेविषयी रडू लागला, एक नाकारलेला राजा.

62 तुम्ही हे पाहीले का? त्यानंतर काही शेकडो वर्षांनी, दाविदाच्या पुत्रावर रस्त्यावर थुंकण्यात आले, आणि तो डोंगरावर होता, तोच डोंगर, खाली यरुशलेमेकडे पाहात होता, एक नाकारलेला राजा. आणि रडला, "यरुशलेमे, जशी कोंबडी आपली पिले पंखाखाली एकवटते, तसे तुझ्या मुलाबाळांना एकवटावयाची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती!"

63 त्याने त्याचा स्वभाव कधीच बदलला नाही, कारण इब्रीकरांस पत्र 13:8 म्हणते, "तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे." देव देहात आला, ह्यासाठी की त्याने मरावे, पापापासून आम्हाला मूक्त करावे. म्हणून तो स्वतः एक—एक मनुष्य बनला.

64 आपण, संत योहान 12:20 पहातो, हेल्लेणी लोकांनी त्याच्याविषयी ऐकले होते. आता, तेथे कोणीही मनुष्य त्याचे ऐकू शकत नाही जोपर्यंत त्यांचे अंतःकरण त्याला पहाण्यासाठी जळत नाही. जसे ईयोब आणि प्राचीन संदेष्टे, जे सर्व त्याला पाहू इच्छित होते. म्हणून, हे हेल्लेणी त्याला पहाण्यासाठी आले. ते फिलिप्पाकडे आले, जो बेथसैदाचा होता, म्हणाले, "महाराज, येशूला भेटावे अशी आमची इच्छा आहे."

65 हेल्लेणी लोक त्याला पाहू इच्छित होते, परंतु ते त्याला पाहू शकत नव्हते कारण तो त्याच्या मानवी मंदिरात होता. "देव ख्रिस्तामध्ये होता, जगाचा त्याच्याशी समेट करीत होता." आता आपल्याला कळते की, ह्यात हे हेल्लेणी त्याला पाहू शकले नाही.

66 आणि त्या शब्दांकडे लक्ष द्या जे येशूने त्यांना विदीत केले, ह्यांनंतर. त्याने म्हटले, “गव्हाचा दाणा जमिनीत पडून मेला नाही तर तो एकटाच राहतो, आणि मेला तर पुष्कळ पीक देतो.” दुसऱ्या शब्दात ते त्याला कधीच पाहू शकणार नाही ह्या बदललेल्या मुखवट्यामध्ये ज्यात तो त्यावेळी होता, कारण तो मानवी शरीरात झाकलेला होता. परंतु जेव्हा हा गव्हाचा दाणा जमिनीत पडेल तेव्हा तो पुष्कळ वंश आणील. त्या समयात, अर्थात, त्याला यहुद्यांकडे पाठवण्यात आले होते. परंतु हा गव्हाचा दाणा पडला पाहीजे. मानवी देहात झाकलेला देव, अविश्वासणाऱ्यांपासून गुप्त होता, परंतु विश्वासणाऱ्यांना प्रगट झाला होता.

67 योहान 1 मध्ये, “प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्द देव होता आणि शब्द देही झाला, आणि आमच्यामध्ये वस्ती केली आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होते.” आता, प्रारंभी शब्द होता. शब्द हे विचाराचे प्रगट करणे आहे.

68 प्रारंभी, तो देव नव्हता. आता, आज इंग्रजी शब्द, *गॉड* ज्याचा अर्थ, “भक्ती करण्यायोग्य” आपल्या बुध्दीसाठी हे गोंधळाचे भासते. तुम्ही कोणालाही एक देव बनवू शकता. तुम्ही कुठल्याही गोष्टीला देव बनवू शकता.

69 परंतु जुन्या करारात, उत्पत्ती 1 मध्ये, “प्रारंभी *देवाने*,” एलोहीम हा शब्द वापरला आहे. *एलोहीम* म्हणजे “स्वअस्तित्व असलेला.” एलोहीम व देव ह्या शब्दात काय फरक आहे. *एलोहीम* म्हणजे “स्वअस्तित्व असलेला.”

70 आपण स्वअस्तित्व असलेले लोक होऊ शकत नाही. आपण सर्वसमर्थ, सर्वव्यापी, सर्व साक्षी आणि सर्वज्ञानी असू शकत नाही. एलोहिम शब्दात हे सर्वगुण आहेत. आपण तसे असू शकत नाही. एक झाड ज्यातून तुम्ही एक देव बनविता, किंवा—किंवा एक इमारत बनवता, ते स्वअस्तित्व असलेले नाही.

71 म्हणून, देव, प्रारंभी, अनंतकालचे जीवन होता, त्याच्यामध्ये गुणधर्म होते, आणि ते गुणधर्म वचन झाले, आणि वचन देहधारी झाले, येशू मुक्तीदाता होता. *मुक्त करणे* म्हणजे, “परत आणणे.” जर त्याला ते परत आणायचे होते, तर ते कुठेतरी असले पाहीजे जेथून ते परत आणावे. म्हणून, तुम्ही पहाता, सर्वजण हे कधीच समजू शकणार नाही. कारण सर्वजण प्रारंभी देवाच्या विचारांमध्ये नव्हते. समजले?

72 त्या याजकांकडे पहा. जेव्हा त्यांनी त्याला स्वतःला वचनाप्रमाणे तो कोण होता, हे प्रगट करताना पाहिले, त्यांनी म्हटले, “तो बालजबूल आहे.” हे दाखवते त्यांचा स्वभाव कोठून होता. ते आधुनिक विचारांच्या दिवसात होते.

73 परंतु जेव्हा ती लहानशी वेश्या, त्याला त्या द्वारापाशी भेटली, आणि तो तिला म्हणाला, त्याचे मसीहाचे चिन्ह तिला प्रगट केले, तिने ज्या गोष्टी केल्या होत्या त्या सांगण्याद्वारे. “का,” तीने म्हटले, “महाराज, आपण संदेष्टे आहा हे आता मला समजले. आम्हाला ठाऊक आहे, मसीहा, जेव्हा तो येईल, तो आम्हाला सर्व गोष्टी सांगेल.” ती त्याला मसीहा, ख्रिस्त म्हणून ओळखत होती, कारण त्याच्यामध्ये वचनातील गुणधर्म पूर्ण होत होते. तुम्ही समजत नाही का? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] ते दोन कागदाचे तुकडे एकत्र जुळत होते. तीने म्हटले, “आम्हाला ठाऊक आहे की, जेव्हा मसीहा येईल.”

74 आता, कदाचित देवाला *हे* आणि *ते* संकरित करावे लागले असेल, तो विशिष्ट प्रकारच्या घंटेचा नाद ऐकण्यासाठी, जसे एक साचा. परंतु जेव्हा येशू वळला, म्हणाला, “मी तोच आहे, जो तुझ्याशी बोलत आहे,” तेथे “बालजबूल” सारखी कुठला अविर्भाव

नव्हता. तिने आपली पाण्याची घागर टाकली, नगरात धावत गेली, आणि म्हणाली, “चला, मी केलेले सर्व काही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा, तोच ख्रिस्त असेल काय?” समजले?

75 आता, ह्याने काय झाले? ती शास्त्रलेख अनुभवासह जोडत होती, जे—जे येशू तिला देत होता. त्याने काय केले? त्याना ख्रिस्ताची ओळख मिळाली. आणि तुम्ही पाहीले का? लगेच, तिच्या पापांची क्षमा मिळाली, कारण, प्रारंभापासून, ती विमोचनीय होती, कारण ती देवाच्या विचारांमध्ये प्रारंभापासून होती. म्हणून, त्याने तिला मुक्त केले, किंवा तिला परत आणले, जेव्हा तिने यहोवाचा, शास्त्रलेख प्रगट होताना पाहीले, जो तो होता, जो तो आहे.

76 आता, जेव्हा येशू आला, जर तो नोहाच्या संदेशासह आला असता, त्याने कार्य झाले नसते. तारु बांधणे, आणि तरंगणे, त्याद्वारे काही लाभ झाला नसता. परंतु तो नोहा परमेश्वराचाच भाग होता. तो एका विशिष्ट प्रकारे वागला कारण तो विशेष होता, आणि त्याचा संदेश विशेष होता कारण ते वचनाचे प्रगट करणे होते.

77 तो मोशेच्या संदेशासह येऊ शकला नसता, कारण त्याद्वारे कार्य झाले नसते. मोशे देवाचा प्रगट केलेला भाग होता, तो त्या समयासाठी प्रगट केलेले वचन होता, परंतु येशू त्यामध्ये येऊ शकला नाही. पवित्र शास्त्रात असे कधीच सांगितले नाही को तो तशाप्रकारे येईल.

78 परंतु जेव्हा तो आला, तो तसाच प्रगट झाला जसे—जसे वचनात म्हटले होते की तो प्रगट होईल, ते सर्व जे मुक्त करण्याजोगे होते त्यांनी त्यावर विश्वास ठेवला, कारण ते देवाच्या विचारांत होते. प्रारंभी जे त्याचे गुणधर्म होते, त्याद्वारे देह केला गेला. आणि पूर्तता करण्याजोगे, आणि देवाकडे परत आणिले गेले. “जितक्यांनी त्याचा स्विकार केला, तितक्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला,” कारण ते सोडविण्याजोगे होते. ते प्रारंभापासून, प्रगट केलेले होते.

79 जर आपण येथे एका क्षणासाठी थांबू शकलो असतो, जर ते शक्य असते, आणि आजरात्री त्यावर विचार केला असता, ह्या समयाचा संदेश, यहोवाने प्रगट केलेला विचार. “जगाच्या स्थापनेपूर्वी,” आपल्याला सांगण्यात आले, “आपली नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली होती.” तेव्हा आपण दोन्ही बाजू पाहू शकतो, जसे मी प्रथम सांगितले, का एक दुसऱ्यापेक्षा वेगळा आहे. ते तसेच असले पाहिजे. ते नेहमीच तसे होते. ते नेहमीच तशाप्रकारे होते, आणि ते नेहमीच तसे असणार. “तो शब्द होता. आणि शब्द देही झाला आणि आम्हामध्ये वस्ती केली.”

80 आता, परमेश्वर...प्राचीन दिवसात जुन्या करारात, आपल्याला आढळते की, जेव्हा तो त्याच्या लोकांना वेगवेगळ्या रुपात प्रगट झाला, त्याने त्याला स्वतःला जुन्या प्राण्याच्या कातड्यामागे लपवले. देव प्राण्याच्या कातड्यामागे त्याच्या दयासनाजवळ लपला होता. आपल्याला आढळते की, कसे शलमोनाने, जेव्हा त्याने परमेश्वराच्या मंदिराचे समर्पण केले, आणि ह्या प्राण्याचे कातडे तेथे लटकत होते, एक पडदा कसा तो अग्नीस्तंभामध्ये आला आणि एक ढग म्हणून, आणि तेथे मागे गेला आणि स्वतःला बाहेरील जगापासून लपवले, परंतु, विश्वासाद्वारे, इस्त्राएल जाणत होते की तो तेथे मागे होता. त्यांना माहीत होते की तो तेथे होता. ह्याची पर्वा न करता की अधर्मी नास्तिक जग काय म्हणत होते. तो अविश्वासणाऱ्यांपासून लपलेला होता. परंतु विश्वासणारा विश्वासाद्वारे, जाणत होता की तो तेथे मागे आहे. त्यांना दया मिळाली आणि तो त्याच्या दयासनाकडे होता, जे एक महान रहस्य होते.

81 तुम्हाला ठाऊक आहे, जुन्या करारात त्या पडद्यामागे प्रवेश करणे म्हणजे मृत्यु होता. आता त्यापासून दूर राहणे म्हणजे मृत्यू आहे. तेव्हा त्याच्या गौरवात जाणे म्हणजे मृत्यू होता. आता त्याच्या गौरवापासून दूर राहणे म्हणजे मृत्यु आहे, अर्थात, हे घडले, जेव्हा कलवरीवर तो पडदा फाटला गेला, जेव्हा तो पडदा फाटला. जुना पडदा. आता त्याच्या उपस्थितीपासून दूर राहणे हा मृत्यू आहे. तेव्हा त्याच्या उपस्थीतीमध्ये जाणे हा मृत्यू होता. समजले? त्याने मागे आणि पुढे बदल केला आणि तुम्ही शास्त्रलेख शोधला पाहिजे हे पहाण्यासाठी की आपण कोणत्या दिवसात राहात आहोत.

82 आता, जेव्हा कलवरीवर तो पडदा फाटला गेला, दयासन पूर्णतः दिसू लागले. (परंतु काय घडले? तो कलवरीवर टांगलेला होता, रक्तामध्ये बुचकळलेला.) जसे ते वर्षानुवर्षे पवित्र स्थानाच्या शुध्दतेसाठी, रक्त दयासनावर शिंपडीत होते, तेथे, देव, त्याच्या महान सामर्थ्यशाली तेजस्वी वीजेच्या शक्तीने, तो पडदा वरुन खालपर्यंत फाटला गेला, आणि दयासन दृश्य स्वरुपात आले.

83 तो खरा, वास्तविक देवाचा कोकरा कलवरीवर टांगलेला होता, खरे दयासन, जेव्हा देवाने स्वतः, किंमत चुकविली आणि आपल्यातील एक झाला, आणि स्वतःला एक मनुष्य असे प्रगट केले, ह्यासाठी आपल्याशी ओळख व्हावी, आणि आम्हीही त्याला ओळखावे. ते दयासन प्रायश्चित्ताच्या दिवशी सर्व इस्त्राएल लोकांसाठी दृश्य स्वरुपात दिसू लागले.

84 परंतु, अरेरे, त्या दिवसांतील वडील मंडळीच्या परंपरेने, त्यांच्या परंपरेनुसार, दयासन लोकांपासून लपविले. जर त्यांनी शास्त्रलेख जाणले असते, प्रत्येक तुकडा त्या चीनी टॅगप्रमाणे जुळला असता. जुन्या करारातील भविष्यवाणी पूर्ण झाली असती, आणि ती होती. आणि जर त्यांना शास्त्रलेख शिकविला गेला असता, त्यांनी दयासन पाहिले असते. “जसे मोशेने,” येथे म्हटले, की, “ह्या दिवसापर्यंत त्यांच्यावर आच्छादन होते. ते अजूनही त्यांच्या हृदयावर ते आहे.” त्यांना ते दिसत नाही.

85 परंतु तो देव होता, दुःख आणि प्रायश्चित्त. तोच खरे दयासन जे पूर्ण दृश्य स्वरुपात उभे होते. जसे आपण स्तोत्र गातो.

> त्याला दृश्य स्वरुपात पाहा.
> तेथे तो, सामर्थ्यशाली जय मिळविणारा,
> जेव्हा त्याने तो पडदा दोन तुकड्यात फाडला.

86 पाहा, तो आला, ते दयासन, मंडळीला पूर्णपणे दिसत होते. परंतु त्यांच्यासाठी, जे त्या वेळच्या प्रचलित मतांच्या खाली होते.

87 आता पुरुष व स्त्रीयां, आणि ह्या सभेचे प्रतिनीधी, मी हे पक्षपाताविना सांगू इच्छितो. परंतु, आजच्या विचारांनुसार, जे आपण येथे उपस्थित आहोत, मला भय आहे की पुर्वजांचे रितीरिवाज, चर्चच्या पुर्वजांनी, हे पुष्कळ लोकांपासून लपवलेले आहे. कारण पवित्र आत्मा भविष्यवाणीनुसार, ह्या अंतिम दिवसांत आलेला आहे, आणि तो पडदा फाडला गेला आहे, पुष्कळ लोक आपल्या पुर्वजांच्या रितीरिवाजांना चिकटून आहेत आणि ह्या कारणामुळे ते हा अतिउच्च आनंद, आणि शांती आणि त्या गोष्टी ज्या मंडळीत आज आहेत, पाहू शकत नाही. तरी ते विश्वासणाऱ्यांना स्पष्ट दिसत आहे.

तो वचन लपवतो, ह्या दिवसातील अभिवचन दिलेले वचन.

88 आता, रितीरिवाजांनी आच्छादन बनवलेले आहे. ते म्हणतात की चमत्कारांचे दिवस निघून गेले आहेत. एक मनुष्य मला म्हणाला, टक्सन, ॲरिजोनामधील एक चांगला,

सुसंस्कृत मनुष्य, जेथे मी राहतो. रमादा येथे माझी सभा होती. आणि आम्ही बिजनेस मेन्स कन्वेन्शन येथे बोलत होतो जेथे प्रभू येशू ख्रिस्त उपस्थित होता आणि महान गोष्टी केल्या. आणि हा ख्रिस्ती सभ्य पुरुष माझ्याकडे आला, आणि त्याने म्हटले…एक मंडळीचा सेवक चांगला मनुष्य, आणि त्याने म्हटले, "भाऊ ब्रॅन्हम, आपण लोकांना प्रेषितीय युगाचे प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करीत आहेस," त्याने सांगितले की, "आणि जेव्हा प्रेषितीय युग समाप्त झाले आहे."

89 आणि मी म्हटले, "मी तुला विनंती करतो, माझ्या भावा, मला पवित्र शास्त्रातून दाखव, की केव्हा प्रेषितीय युग समाप्त झाले." मी म्हटले, "प्रेषितीय युगाची सुरुवात पेंटेकॉस्टच्या दिवशी झाली, आणि ते…पेत्राने, पेंटेकॉस्टच्या दिवशी म्हटले, हे वचन तुम्हाला, आणि तुमच्या मुलाबाळांना, आणि जे दूर आहेत त्या सर्वांना म्हणजे जितक्यांना परमेश्वर आपला देव स्वतःकडे बोलावील तितक्यांना दिले आहे. ते केव्हा समाप्त झाले? जर देव आजही बोलावीत आहे, तर प्रेषितीय युग आजही चालू आहे."

90 आणि येथेच जेथे लोक कित्येक लोकांना, त्यांच्या पूर्वजांच्या रितीरिवाजांद्वारे, आंधळे करण्याचा प्रयत्न करीत आहे, जसे ते त्यावेळी होते. आणि तुम्हाला हे समजले नाही की का लोक इतके आनंदित आणि इतके उत्साही आहेत. आणि—आणि ह्या सभा, इतर लोकांसाठी, इतक्या विक्षिप्त विचित्र गोष्टी आहेत, ह्याचे कारण हे आहे की ते पाहतात ते त्या अडथळ्यांना तोडून जातात. ते त्या पडद्यांतून देवाच्या उपस्थितीत जातात, जेथे ते ह्या समयासाठी प्रगट केलेले वचन लोकांसमोर प्रगट केलेले पाहतात. ते देवाचे अभिवचन पाहतात.

91 योएल 2:28 मध्ये, त्याने अभिवचन दिले की, "ह्या अंतिम दिवसात मनुष्य मात्रांवर वळवाचा पाऊस *पाडील,* अंतिम दिवसात." मला वाटते ग्रीक शब्द *केनोज* हा आहे, ज्याचा अर्थ आहे की त्याने स्वतःला "रिक्त केले." हे तशाप्रकारे नाही जसे आपण म्हणतो, जसे काहीतरी एखाद्या व्यक्तीच्या आत होते, ते त्याने रिक्त केले. परंतु, त्याने स्वतःला रिक्त केले,

92 तो बदलला; तो *एन मॉर्फी* (बहुरुपी) त्याने—त्याने आपला मुखवटा बदलला, जो तो होता, जो तो आहे. तो कधीच त्याचा स्वभाव बदलत नाही. परंतु पेंटेकॉस्टच्या दिवशी, त्याने स्वतःला मनुष्याच्या पुत्रापासून, देवाचा पुत्र असे बदलले. तो लोकां*बरोबर*, आला नाही. तो लोकां*मध्ये* आला, पाहा, तोच देव, जो त्याची सेवकाई पुढे, ह्या महान युगात करीत आहे.

93 त्याने बायबलमध्ये भविष्यवाणी केली आहे, की, "तो एक विशेष दिवस होईल, तो परमेश्वरालाच ठाऊक तो ना धड दिवस, ना धड रात्र असा होईल; तसे असे होईल की संध्याकाळी प्रकाश राहील." आता सूर्य, भौगोलिकरित्या, पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेस मावळतो. तो सर्वकाळ तोच सूर्य आहे. आता जेव्हा, पुत्राने, एस–ओ–एन, स्वतःला अभिवचनाच्या वचनात इस्त्राएलास, पूर्वेकडील लोकांना, प्रगट केले.

94 आपणाकडे एक अंधूक प्रकाशाचा दिवस होता. आपल्याला सुधारकांमध्ये पुरेसा प्रकाश मिळाला आहे, आणि तसे, ज्याद्वारे मंडळ्या आणि संप्रदाय बनवावे, आणि त्यांच्यात सामील व्हावे आणि आत यावे. आणि लहान बालकांचे चुंबन घ्यावे; आणि वयात आलेल्यांशी लग्न करावे, आणि मृतांना गाडावे; आणि अशाच गोष्टी; आणि मंडळ्यांमध्ये राहावे.

95 परंतु सांज समयी, "तेथे प्रकाश असेल," त्याने म्हटले, "सांज समयी." आणि कुठलाही शास्त्रलेख मोडू शकत नाही. आणि तोच पुत्र ज्याने स्वतःला, *केनोज*,

पेंटेकॉस्टच्या दिवशी ओतले, अभिवचन दिले आहे की सांजसमयी तो त्याच गोष्टी करील. समजले? ते अभिवचनाप्रमाणे आहे.

96 टॅग एकत्र करा. काय घडत आहे त्याकडे पाहा, आणि पाहा की त्याने काय अभिवचन दिले आहे, तेव्हा तुम्हाला कळेल की आपण कोठे आहोत. गोष्टी एकत्र करा. तुम्ही ह्या महान आणि सामर्थ्यशाली एकाचे प्रगट होणे पाहू शकता. रितीरिवाजांनी लोकांना पुन्हा ह्या महान गोष्टी ज्याविषयी भविष्यवाणी केली गेली आहे त्यापासून आंधळे केले आहे.

97 मोशे जेव्हा तो पर्वतावरुन खाली आला, जेथे अग्नी होता, किती सुंदर उदाहरण आहे!

98 मोशे खाली मिसरात गेला आणि मंडळीतील वडिलांना म्हणाला की प्रभू परमेश्वराने त्याला "**मी आहे**" च्या नावाने दर्शन दिले. ते नाव वर्तमान काळ आहे. "मी होता; किंवा मी असेन" नाही. परंतु, "**मी आहे**," जो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे. तो वर्तमान काळ आहे. तो...त्याची तुलना इब्री १३:८ सह होते, "येशू ख्रिस्त काल, आज व युगानुयुग सारखा आहे."

99 ते आजही भविष्यवाणी केलेले वचन आहे, मंडळी, जिला वचनाबरोबर राहावे लागेल, ह्या दिवसाच्या अनुभवासह सुधारकांनी तो अनुभवला, ओह, परंतु हा दुसरा दिवस आहे. पाहा कोणत्या दिवसात आपण राहात आहोत. जसे तो ह्या पृथ्वीवर आला, त्या दिवसात तो तसा येऊ शकला नाही. जसा—जसा मोशे आला, किंवा इतर संदेष्टे आले. तशी भविष्यवाणी करण्यात आली नव्हती. आणि अंतिम दिवसात, अशी भविष्यवाणी करण्यात आली होती की तो अशाप्रकारे येईल. ते लूथरच्या संजीवनाप्रमाणे येऊ शकत नाही. ते वेस्लीच्या संजीवनाप्रमाणे येऊ शकत नाही. हा पुर्नस्थापनेचा समय आहे. हा असा समय आहे की ते मूळ पुत्राच्या प्रकाशाकडे, मूळ स्थितीकडे परत आले पाहिजे.

100 ओह, आपण ह्यावर शास्त्रलेख कसे देऊ शकतो! आणि तुम्ही दैवज्ञानी, तुम्ही जगाच्या कुठल्या भागातून आला आहात, तुम्हाला ठाऊक आहे की ते सत्य आहे ते अभिवचन आहे. तेच त्या लोकांना विलक्षण बनवते. तेच ते आहे जे चक्रम व्यक्ती बनवतात, तुम्ही त्यांना तसे संबोधतात. त्याचे कारण हे आहे की ते...ते आहे...रितीरिवाजांपासून, पडदा उघडण्यात आला आहे. आणि तो ते पाहतात. तो काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे. समजले? ते—ते देवाचे वचन आहे आणि आपण त्याच्या विरुध्द जाऊ शकत नाही, कारण शास्त्रलेख मोडला जाऊ शकत नाही. होय आपण पाहतो की त्याने तसे वचन दिलेले आहे. त्याने स्वतःला त्याच्या लोकांमध्ये रिक्त केले. आणि तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे.

101 मोशे, तो मिसरात गेला आणि हे प्रगट केले, तेव्हा पित्याने त्याच्या संदेशाचे समर्थन केले त्याच अग्नीस्तंभात, सियोन पर्वतावर येण्याद्वारे, आणि पर्वतावर अग्नी पेटवीला. आपण ते पाहिले का? तो एक ज्याने वचन दिले होते, त्याने त्याला वचनासह पुढे आणले. त्याच्याकडे आज्ञा होत्या. आणि ह्या आज्ञा प्राप्त करण्यासाठी...त्याला ह्या आज्ञा वचन होते. तो पर्यंत वचन लोकांपुढे आले नव्हते. म्हणून, वचन सदैव संदेष्ट्यांकडे येते, आणि तो त्या समयासाठी संदेष्टा होता.

102 जसे येशू वचन होता. योहान एक संदेष्टा होता. आणि येशू त्याच्याकडे पाण्यामध्ये आला, कारण वचन सदैव संदेष्ट्याकडे न चुकता येते. समजले? वचन त्याच्याकडे येते.

103 म्हणून, मोशे, वचन त्याच्याकडे आले, त्या आज्ञा. आणि त्याच्याकडे त्या होत्या. आता, का? वचन त्याच्याकडे देण्याआधी आणि प्रगट करण्याआधी, मोशे आपल्या तोंडावर आच्छादन घालीत असे, कारण वचन पूर्णतः प्रगट झाले नव्हते. त्यांना कळत

होते की काहीतरी घडले आहे, परंतु त्यांना समजत नव्हते की ते काय होते, गर्जना आणि वीजा चमकत होत्या. तोपर्यंत, ते म्हणाले, “मोशेला बोलू दे, आणि देव नको.”

104 आणि देवाने म्हटले, “ठीक आहे, मी तसे करीन. येथून पुढे, मी अशाप्रकारे कधीही प्रगट होणार नाही. मी त्यांच्याकडे एक संदेष्टा पाठवीन. तर तो…मी माझ्या संदेष्ट्याद्वारे बोलेन.”

105 आता, जर मोशे, ह्या स्वाभाविक नियमांसह, (जसे पौलाने, दुसरे करिंथकरांस पत्रात, आम्हास प्रगट केले आहे) त्याचे तोंड त्याला झाकावे लागे, तर जे आध्यात्मिक ते विशेषकरुन तेजस्वी होणार आणि अविश्वासणाऱ्यांसाठी आच्छादलेले आहे, त्याला प्रगट करण्याअगोदर! ते कसे अधिक त्याला संबोधतील…मोशे एक विलक्षण मनुष्य होता. तुम्हाला ते कितीतरी अधिक संबोधतील, जे पडदा फाडून, अग्नीस्तंभाच्या आत गेले आहेत, आशीर्वादासह परत आले आहेत! आणि आता तुम्ही आच्छादन घातलेले आहात. लोक ते पाहू शकत नाही. ते हे समजू शकत नाही.

106 “जर स्वाभाविक इतके तेज असेल, तर आध्यात्मिक किती असेल! जर स्वाभाविक, नष्ट होत चाललेले जर तेजयुक्त आहे, तर जे शाश्वत ते कितीतरी अधिक तेजस्वी असणार!”

107 परंतु, तरीही, ते आच्छादलेले आहे. ते विश्वासणाऱ्यांसाठी आच्छादलेले नाही, परंतु अविश्वासणाऱ्यांसाठी आहे. तो ते पाहू शकत नाही. देव सदैव आपणास अविश्वासणाऱ्यांपासून लपवतो रितीरिवाज ते लपवतात. जसे त्यांनी ते तेव्हा केले, तसे ते आजही करीत आहे.

108 आपल्याकडे आता आध्यात्मिक आच्छादन आहे, तेव्हा ते भौतिक आच्छादन होते. ते संदेष्ट्यांद्वारे लिखीत शब्दाने प्रगट केले गेले, एक भविष्यवादी, जो लिखीत वचनासह ते स्पष्ट करण्यासाठी येतो.

109 त्यांना ठाऊक होते की तेथे वचन होते, परंतु त्यांना त्याचा अर्थ ठाऊक नव्हता. आणि मोशेने ते स्पष्ट केले. त्याने म्हटले, “आज्ञा हे म्हणतात, आणि हे का आहे.” त्याने ते स्पष्ट केले. आणि ते स्पष्ट करण्याआधी ते आच्छादलेले होते.

110 आणि आज, ते तशाचप्रकारे, लोकांसाठी आच्छादलेले आहे, जोपर्यंत ते प्रगट केले जात नाही आणि लोकांना स्पष्ट केले जात नाही. देव, सामर्थ्यशाली परमेश्वर, मनुष्य देहात आच्छादित होता, ते वचन. लक्ष द्या. आता आपल्याला आढळते की ते अविश्वासणाऱ्यांसाठी आच्छादलेले होते, परंतु विश्वासणाऱ्याला प्रगट केले होते.

111 लक्ष द्या, मोशेला ह्या अग्नीस्तंभात एकट्यालाच प्रवेश करावा लागत होता. त्याच्याबरोबर दूसरे कोणी जाऊ शकत नव्हते. तो नव्हता…तो…ते आपल्याला काय सांगत आहे? तुम्ही ह्यात ह्या पेंटेकॉस्टल समुहात सामील होऊन येऊ शकत नाही. समजले? त्याने कधीच ह्या समुहाला प्रगट केले नाही. त्याने व्यक्तीला हे प्रगट केले आहे. आणि आजही ते तशाचप्रकारे आहे. तुम्ही म्हणता, “मी ह्या—ह्या मंडळीचा आहे. मी *ह्याचा* आहे.” परंतु त्याने काही काम होणार नाही. समजले?

112 आणि कोणीही मोशेच्या मागे जाण्याचा, त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करी, म्हणजे मृत्यु होता. आणि म्हणून आजही तसेच आहे, नक्कल करण्याचा प्रयत्न करणे, हा आध्यात्मिक मृत्यू आहे. तेच काय ते आहे…

113 आज रात्री, आपण अशा दैहीक गोष्टीत जात आहोत, आपल्यामध्ये असे समुह उदयास येत आहेत, दैहीक तुलना; कोणीतरी त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो,

आणि वेगळे जीवन जगतो; ते मद्य पिऊ शकतात, धुम्रपान करु शकतात, स्त्रिया कसेही जगू शकतात...बहुतेकजण त्यांना वाटेल तसे, आणि जगाची आवड धरतात, आणि घरी राहतात. आणि टेलीविजन पाहतात. आणि जगातील गोष्टी, आणि तरीही स्वतःला पेंटेकॉस्टल्स म्हणवतात. ते मूळ गोष्टींची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. अजूनही, त्यांना ते कधीही प्रगट करण्यात आले नाही. जेव्हा ते प्रगट केले जाते, ते तेजस्वी असते, आणि कोणीतरी ते तुमच्यांतून काढते. जेव्हा तुम्ही त्यामध्ये चालता. तुम्ही आच्छादन बनता. ते...त्याने कार्य होत नाही. आणि नक्कल करणे हा मृत्यु होता.

114 मोशेचे आच्छादन; तो लोकांसाठी जीवंत वचन होता. आणि आज, ते लोक ज्यांनी आच्छादन घातलेले आहे तेही तसेच आहेत. “ते लिखित पत्र आहेत, सर्वांनी वाचलेले.” *नविन* पत्र नाही. परंतु पत्र जे लिहीलेले, सर्व माणसांना कळलेले. ते—ते. ते आहेत जे वचनावर आणि ह्या दिवसांतील अभिवचनावर विश्वास ठेवतात, की देव त्याचा आत्मा, सर्व मनुष्यमात्रांवर ओतत आहे, आणि ते लिखीत पत्र आहे. आणि जेव्हा एखादा व्यक्ती दैहिकरित्या त्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो, त्याचा परतीचा मार्ग सुरु होतो. तुमचे जीवन दाखवते की तुम्ही कोण आहात.

115 एकदा तेथे एक मुलगा होता, तो काही समस्येत सापडला होता. तो एक चांगला मुलगा होता, परंतु तो—तो कोर्टात गेला. आणि न्यायाधिशाने म्हटले, “तू मला अपराधी आढळला आहेस. मला तुला जन्मठेपेची शिक्षा दिली पाहिजे.”

116 त्याने म्हटले, “माझा दावा मलाच चालवायचा आहे.” त्याने म्हटले, “मी माझा पुरावा पाहू इच्छितो.”

117 त्याने म्हटले, “तुझा पुरावा काहीच नाही. तुझा पुरावा तुला दोषी ठरवत आहे.”

118 आणि आज तीच अवस्था आहे. कारण हे आहे की मंडळीची जशी हवी तशी प्रगती झालेली नाही. तो पुरावा आहे. ते जीवन आहे. आपण अधिक समर्पित बनलो पाहीजे. आपण देवाच्या प्रत्येक शब्दावर विश्वास ठेवला पाहीजे. आपण तोपर्यंत शोध घेतला पाहिजे जोपर्यंत ते वचन आपणासाठी खरे होत नाही. समजले? समजले? आपला पुरावा आपल्याला तेथे प्रवेश करण्यापासून दूर ठेवीत आहे.

119 परंतु, एकदा, (तुम्हाला ह्या बंधनातून बाहेर काढण्यासाठी) ह्याच न्यायालयात, त्या मूलाकडे पैसे नव्हते. तो दंड भरु शकत नव्हता. दंडाची रक्कम हजारो डॉलर्समध्ये होती. परंतु त्याचा एक मोठा भाऊ होता जो आला आणि त्याच्यासाठी त्याने ती रक्कम भरली.

120 आता, आपल्याकडे एक ज्येष्ठ बंधू, येशू, देवाचा पुत्र आहे. आणि तो आपला दंड भरण्यासाठी आला, जर आपण ह्यावर विश्वास ठेवू आणि त्या आच्छादनामध्ये त्याच्यासह प्रवेश करण्यासाठी समर्थ बनू. जसे, तो आपला मोशे आहे. येशू हा आपला आजचा मोशे आहे. मोशे आच्छादन घेतलेला, लोकांसाठी जीवंत वचन होता. आज, येशू, आच्छादन घेतलेला, लोकांसाठी जीवंत वचन आहे, की, येशू मंडळीमध्ये आहे. तो पवित्र आत्मा, देवाचा पुत्र लोकांमध्ये, आहे. वचन ह्या काळाच्या अभिवचनाद्वारे प्रगट करीत आहे, अगदी तसेच करीत आहे. तसेच आता.

121 आणि लक्षात ठेवा, मोशेने हे केले, आणि हे प्रगट केले, सर्व जगाला नाही, परंतु निर्गमन असणाऱ्या लोकांना, केवळ एका विशिष्ट लोकांना, ते जे निर्गमनात बाहेर आले...निर्गमनामध्ये.

122 आणि आज, तो पवित्र आत्मा, त्या लोकांच्या तोंडावर जे म्हणतात, “दैवी आरोग्य बरोबर नाही.” जेव्हा मी सल्लामसलत करीत होतो...

123 त्या दुसऱ्या दिवशी, एका डॉक्टरने मला, एका बाईच्या संदर्भात बोलावले, होय, तेथे तसे चार किंवा पाच आजारी होते, जे मरणाच्या तोंडावर उभे होते, त्याच्यासाठी काही तास होते, आणि पवित्र आत्म्याने त्यांना बरे केले. डॉक्टर त्याविषयी प्रश्न विचारीत होते. त्याने म्हटले, “हे कसे होऊ शकते? का,” त्याने म्हटले, “मी—मी...ते माझे रुग्ण आहेत.”

124 मी म्हटले, “ते होते. परंतु आता ते देवाचे आहेत. ते—ते, ते आता त्याचे लोक आहेत.” समजले?

125 आणि म्हणून तुम्ही ती गोष्ट पाहात आहात, की देव निर्गमनात बोलावीत आहे, त्यांनी मांसमय पडद्यामागून यावे जे नक्कल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, जे मंडळीचे सदस्य होऊ पहात आहेत. मेथडिस्ट, बाप्तिस्ट, प्रेसबेटेरियन नाहीत, सर्व एकत्र, परंतु पेंटेकॉस्टल मंडळ्या. ही एक व्यक्तीगत बाब आहे. तुम्ही आणि देव. तुम्हालाच आत जायचे आहे, तुमचा समुह नव्हे, तुमची मंडळी नव्हे, तुमचे पाळक नव्हे, परंतु ते तुम्ही आहात ज्यांना आत जायचे आहे.

126 माझी इच्छा आहे की तुम्ही मोशेच्या आणखी एका स्वभाव वैशिष्ट्याचे निरीक्षण करावे. जरी, एक संदेष्टा, एक थोर व्यक्ती तो होता, जेव्हा तो वचनासह बाहेर आला, लोकांनी पाहिले की तो बदलला होता. काहीतरी त्याला झाले होते. जेव्हा तो त्या समयाच्या प्रगट केलेल्या वचनासह बाहेर आला, त्या आज्ञांसह, तो एक बदललेला व्यक्ती होता.

127 आणि तसेच तुम्ही असाल, जेव्हा तुम्ही त्या मानवी पडद्यामागून बाहेर येता जे ह्या अशा सभांवर हसले असते, तो मनुष्य जो दैवी आरोग्यावर अडखळला असता, आणि म्हणाला असता की चमत्काराचे दिवस गेले आहेत. तुम्ही मानवी पडद्यामागून येता, तो रितीरिवाजाचा पडदा टाकून देता, आणि सर्वांना कळून येईल की तुम्हाला काहीतरी झाले आहे.

128 जसे आपले सन्माननीय भाऊ, जीम ब्राऊन. मी कल्पना करतो की बहुतेक प्रेसबेटेरियन जाणतात की त्याला काहीतरी झाले आहे, कारण तो—तो त्या रितीरिवाजांच्या पडद्यामागून बाहेर आलेला आहे. त्याने त्या लोकांमध्ये काहीतरी पाहीले, ज्याने तो आकर्षित झाला, आणि तो त्या पडद्यामागून बाहेर आला.

129 तर, तुम्ही, जेव्हा तुम्ही त्या पडद्यामागून बाहेर येता, तेव्हा तुम्ही संपूर्णपणे लोकांच्या पाहण्यात येता, की ते पाहू शकतात की तुम्हाला काहीतरी झाले आहे. अविश्वासणाऱ्यांसाठी वचन आच्छादलेले आहे, परंतु विश्वासणाऱ्यासाठी पूर्ण प्रगट झालेले आहे. “येशू ख्रिस्त हा काल, आज, आणि युगानुयुग सारखाच आहे.”

130 तेव्हा, तो देव होता. त्यांच्या दिवसात, तो देव मनुष्यामध्ये होता, त्याचा पुत्र, येशू ख्रिस्त, आपण तसा विश्वास करतो. केवळ एक संदेष्टा नाही, केवळ एक सामान्य मनुष्य नाही, सामान्य मानव. ख्रिस्तामध्ये तो देव होता. देव एका मनुष्यामध्ये; देवत्वाची पूर्णता, देहरुपाने एका मनुष्यामध्ये, देव एका मनुष्यामध्ये!

131 आता देव मनुष्यांमध्ये, देवाची पूर्णता देवत्वामध्ये, देहरुपाने त्याच्या संपुर्ण मंडळीमध्ये, स्वतःला प्रगट करीत आहे, त्याचे वचन पूर्ण करीत आहे.

132 आता आपल्याला आढळते, देवावर, सर्व युगात, आवरण होते. तो, देव पडद्यामागे लपलेला होता.

133 हे मला एका—एका लहान गोष्टीची आठवण करुन देते जी दक्षिणेला घडली होती. आणि तेथे एक ख्रिस्ती कुटूंब होते. आणि ह्या ख्रिस्ती कुटूंबात ते देवावर विश्वास करीत होते, आणि ते—ते विचार करीत होते की—की देव त्यांचे सर्व संकटापासून रक्षण करतो, आणि जे, तो करतो. आणि त्यांचा एक लहान ज्युनिअर, एक लहान मुलगा जो अंदाजे सात किंवा आठ वर्षांचा होता. आणि—आणि तो संडे स्कूलला गेला होता आणि तो एक खूप चांगला लहान मुलगा होता. परंतु तो वादळाला घाबरत होता, विशेषतः जेव्हा वीज चमकत असे.

134 आणि मी हे एका मनुष्याला सांगितले, दुसऱ्या दिवशी, जेव्हा हा भाग बाहेर आला की हा मनुष्य बरा झाला आहे. ह्याच सेवकाने म्हटले, "भाऊ ब्रॅन्हम, ते तुझ्यामधून एक देव तयार करतात."

135 बरे, तो एक समीक्षक होता, म्हणून मला वाटले मी त्याच्या विचारांना उत्तर देऊ, केवळ थोडेसे. कुणाला दुखविण्यासाठी नव्हे, तुम्हाला माहीत आहे, परंतु केवळ...मी म्हटले, "असे होणे, शास्त्रलेखापासून फार दूर आहे का?" समजले? मी म्हणालो, "नाही, ते दूर नाही," मी म्हटले, "कारण येशूने संदेष्ट्यांना 'देव' म्हटले. समजले? ते बरोबर आहे, 'देव.'"

136 आणि ते म्हणतात, "बरे, तुम्ही लोक देवाची जागा घेण्याचा प्रयत्न करतात." ते सुध्दा फार दुर नाही. ते अगदी तसेच आहे. ते अगदी तसे आहे. देव देहामध्ये प्रगट झाला, जसे त्याने अभिवचन दिले.

137 हे लहानसे कुटूंब, आम्हाला आढळले. मी त्याला ही लहान गोष्ट सांगितली, जी नुकताच माझ्या मनात आली. की, एके रात्री तेथे वादळ आले, आणि आई ज्युनिअरला म्हणाली, "आता, मुला तू वर जा, आणि बिछान्यावर झोप."

म्हणाला, "मम्मा, मी घाबरतो," त्याने म्हटले.

"तुला काहीही इजा होणार नाही. वर जा आणि झोप."

138 लहान ज्युनिअर तेथे झोपला होता, आणि वीज खिडकीच्या सभोवती चकाकत होती. आणि हा लहान मुलगा इतका चिंताग्रस्त झाला, त्याने त्याचे डोके पांघरुणाखाली झाकले, आणि तो अजूनही वीजेचा कडकडाट ऐकू शकत होता, किंवा वीज चमकताना खिडक्यांवर पाहू शकत होता, आणि—आणि गडगडाट ऐकू शकत होता. म्हणून त्याने म्हटले, "मम्मा!"

आणि तिने म्हटले, "ज्युनिअर, तुला काय हवेय?"

म्हणाला, "येथे वर ये आणि माझ्याबरोबर झोप."

139 म्हणून ती वर आली, जसे एक चांगली विश्वासू आई करील. आणि ती वर आली, आणि तिने छोट्या ज्यूनिअरला तिच्या मिठीत घेतले. आणि ती म्हणाली, "ज्युनिअर, मम्मा तुझ्याशी ह्या क्षणी बोलू इच्छित आहे."

म्हणाला, "ठीक आहे, मम्मा."

140 मी म्हटले, "आता हे मनात ठेवले पाहीजे." आपण नेहमी चर्चला जातो. आपण बायबल वाचतो. आपण प्रार्थना करतो. आपण एक ख्रिस्ती कुटूंब आहोत. आपण देवावर विश्वास ठेवतो. आणि म्हणतो, "आम्ही विश्वास ठेवतो की, वादळामध्ये आणि काहीही झाले तरी, देव आमचा रक्षक आहे."

141 त्याने म्हटले, "मम्मा, मी ह्या प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवतो. परंतु," म्हणाला, "जेव्हा ती वीज इतकी जवळ येते," त्याने म्हटले, "मला—मला देव त्या आच्छादनासह पाहीजे."

142 म्हणून, मला—मला वाटते, केवळ ज्युनिअरच नव्हे, परंतु आपण सर्वांनाही तशाप्रकारे वाटते. जेव्हा आपण एकत्र येतो, जेव्हा आपण एकमेकांसाठी प्रार्थना करतो देव तेथे त्या आच्छादनासह असतो.

143 आणि येथे आपणास आढळते की देव नेहमीच त्याच्यावर आवरण ठेवत असतो. जेव्हा मोशेने त्याला पाहिले, त्याच्यावर आवरण होते, तो मनुष्यासारखा दिसला. जेव्हा देव त्या पडद्यामागे होता, त्याच्यावर आवरण होते आणि देव त्या पडद्यामागे होता, त्याच्यावर आवरण होते. आणि देव, आजरात्री, त्याच्या मंडळीत, त्याच्या मंडळीत आवरणाखाली आहे. आजरात्री, जो अजूनही तोच देव आहे. आपणास ते आढळते.

144 परंतु आता, आता पर्यंत, ते कातड्याचे आच्छादन म्हणजे ते आहे जे रितीरिवाज पकडून ठेवते. ते विश्वास ठेवू शकत नाही की देवच त्यांना तसे वागण्यास भाग पाडीत आहे. समजले? ह्याचे कारण हे आहे की देव त्याच्या मंडळीत आच्छादलेला आहे, आवरणाखाली; त्यावर आवरण. ते बरोबर आहे. तो अविश्वासणाऱ्यापासून लपलेला आहे. आणि विश्वासणाऱ्यांस प्रगट झाला आहे. होय, महाशय.

145 आता, जेव्हा त्यांचा रितीरिवाजाचा पडदा, त्यांच्या पूर्वजांचा पडदा आणि ते वचन फाडून बाहेर येते, तेव्हा निश्चितच, आज ते, पूर्णतः दृश्यात येते, आपण त्याला पाहतो, ते दैवी पुन्हा मानवी देहात झाकले जाते. इब्रीकरांस पत्र 1ला अध्याय त्याविषयी सांगतो.

146 आणि उत्पत्ती 18 मध्येसुध्दा. तुम्ही लक्षात ठेवा, देव एक मनुष्य होता, तेथे उभा होता, खात होता, आणि अब्राहामाशी बोलत होता, आणि सारा तंबूत मागे काय करीत होती हे त्याने सांगितले.

147 आणि येशूने म्हटले, "जसे सदोमाच्या दिवसांत होते, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्यावेळी होईल." देवपण मानवी देहात झाकलेले होते! आता, लक्षात ठेवा, येशूने असे म्हटले नाही, "जेव्हा देवाचा पुत्र प्रगट होईल." लूक 17वा अध्याय, मला वाटते, आणि 20 वे, 21 वे वचन, तेथे कुठेतरी, त्याने म्हटले, "जेव्हा मनुष्याचा पुत्र प्रगट होईल. मनुष्याच्या पुत्र, पुन्हा—पुन्हा मंडळीमध्ये, मनुष्यांमध्ये प्रगट होईल. देवाचा पुत्र नव्हे, परंतु मनुष्याचा पुत्र पुन्हा, पुन्हा त्याच्या मंडळीमध्ये अंतिम दिवसात. आम्हाला आढळते की त्याने ह्याविषयीचे अभिवचन देवाच्या अभिवचनात दिले आहे.

148 जुन्या करारात, आपण आणखी एक गोष्ट पाहतो. माझ्याकडे येथे तो शास्त्रलेख आहे, निर्गमनच्या पुस्तकात ते तहशाचे कातडे, ते काय करीत होते? ते देवाचे तेज लोकांपासून झाकत होते. ते तहशाचे कातडे; लोक देखील पाहू शकत नव्हते, कारण ते कातडे होते, ज्यावर ते पकडले होते. ते कातडे...देवाचे तेज त्या कातड्यामागे होते.

149 आणि आता देवाचे तेज तुमच्या त्वचेच्या मागे आहे. ते बरोबर आहे. आणि रितीरिवाज ते पाहू शकत नाही. ते आच्छादनाखाली आहे, जेथे त्याचे वचन होते.

150 त्या पडद्याच्यामागे, त्या तहशाच्या कातड्यामागे काय होते?

151 जेथे, "तेथे कुठलीही शोभा नव्हती ज्याविषयी आपण इच्छा करावी. तो देह केला गेला आणि आम्हामध्ये वस्ती केली, त्यामध्ये अजूनही काही सौंदर्य नव्हते ज्याची आपण इच्छा करावी."

152 आणि आता तीच गोष्ट आजही आहे. तेथे पुरुष किंवा स्त्रीमध्ये काहीच नाही, ज्याविषयी इच्छा करु शकतो. परंतु हे काय आहे जे त्याच्यामागे आहे. तेच ते आहे. तुम्ही म्हणता, "अच्छा तो व्यक्ती, मला ठाऊक आहे तो दारु पित असे. तो हे करीत असे." मी ह्याविषयी पर्वा करीत नाही की तो काय करीत असे. त्या आवरणाखाली काय लपलेले होते? त्याच्या मागे जे आहे, ते महत्त्वाचे आहे. हेच ते आहे. जे लोकांना आंधळे करते. ते आवरण लोकांना आंधळे बनवते. समजले? ते म्हणतात, "मला लक्षात आहे जेव्हा ती स्त्री तसे करीत असे." मला ठाऊक आहे ती काय करीत असे, परंतु आता काय आहे? समजले?

153 ते कातडे, जे एकेकाळी तहशावर होते, परंतु आता ते देवाचे तेज झाकीत आहे, त्याच्यामध्ये ठेवलेले आहे. ते एका प्राण्यावर होते, परंतु आता त्यामध्ये देवाचे तेज वास करीत आहे.

154 आणि तशाच तऱ्हेने तुमची त्वचाही, आजरात्री, बदलली जाऊ शकते, ह्यासाठी देवाचे वस्तीस्थान बनवले जाऊ शकते, देव मानवामध्ये वस्ती करीत आहे.

155 पाहा, त्या जुन्या तहशाच्या कातड्यामागे, आपल्याला आढळते...त्याच्या आतमध्ये वचन होते. आणि, वचनासह, तेथे समक्षतेची भाकर सुध्दा होती. कराराचा कोश शिंपडलेला होता. आणि ते काय होते? तेथे देवाचे शेकेन्ना गौरव होते.

156 आता, वचन हे एक बीज आहे, त्याची वाढ होऊ शकत नाही. जोपर्यंत...पुत्र (Son) त्यावर प्रकाशत नाही. जीवंत राहण्यासाठी पुत्र (Son) बीजावर प्रकाशलाच पाहिजे, ह्यासाठी कि त्याने फळ द्यावे, त्याची वाढ व्हावी. आणि तोच एक मार्ग आहे. तुम्ही देवाचे वचन घ्या, पहा, देवाचे वचन तुमच्या अंतःकरणात घ्या, आणि शेकेन्हा गौरवामध्ये चाला. आणि जेव्हा तुम्ही तसे करता, तो समक्षतेची भाकर, मान्ना आणतो, तो केवळ वेगळे केलेल्या लोकांनाच दिला आहे. एकच गोष्ट आहे जी ते खाऊ शकते, तिलाच ते खाण्याची परवानगी देण्यात आली आहे. ते म्हणजे ते लोक आहेत ज्यांना परवानगी देण्यात आली आहे. आणि ते जाणतात. पौलाने येथे म्हटले आहे, "गौरवांतून गौरवांत जात आहेत." तुम्हाला समजले? शेवटी, ते तिच्या मूळ गौरवापर्यंत पोहचते.

157 हे अगदी सकाळच्या गौरवाच्या बीजासारखे आहे. फुलाचे बीज, जे भूमीत पडते. मक्याचे बीज जमिनीत पडते. पहिली गोष्ट काय घडते? ते वर येते, आणि तो एक लहानसा, अंकूर असतो, मग तो गोंड्यापर्यंत जातो. मग गोंड्यापासून, पुन्हा मूळ बीजाकडे जातो.

158 बरे, तीच गोष्ट मंडळीने केली आहे. ती लूथर, वेसलीपासून आली, आणि आता पुन्हा त्या मूळ बीजाकडे, परत त्या मूळ गौरवाकडे, परत त्या गौरवाकडे जे प्रारंभी होते. पुत्र (Son) जो पूर्वेला होता, तो तोच पुत्र (Son) आहे, जो पश्चिमेला प्रगट झाला आहे, गौरवांतून गौरवाकडे जात आहे. ती मूर्तीपूजकांपासून लूथरमध्ये बदलली आणि लूथरमधून, वेस्लीमध्ये वेस्लीमधून, पेंटेकॉस्टमध्ये; आणि पुढे आणि पुढे, गौरवांतून गौरवात जात आहे, गुप्त मान्ना उत्पन्न करीत आहे.

159 आणि आता ती, परिपक्व आहे त्याला त्याच्या मूळच्या स्थितीत आणण्यास, अपरिपक्व आहे, त्याची तीच सेवकाई तोच येशू, तेच सामर्थ्य, तोच पवित्र आत्मा. तोच एक जो पेंटेकॉस्टच्या दिवशी खाली उतरला, तो तोच पवित्र आत्मा आहे जो आज प्रगट झाला आहे, गौरवामधून गौरवात, गौरवाकडे आणि ते पुन्हा त्याच्या मूळ बीजाकडे, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासह, त्याच चिन्हांसह, तीच अद्भूते, तोच बाप्तिस्मा, त्याच प्रकारचे लोक, त्याच प्रकारे चालणारे, त्याच सामर्थ्यासह, तीच संवेदना. ती गौरवामधून गौरवात

जाणे आहे. आणि नंतर, “ह्या गौरवातून त्याच्या स्वतः सारख्या शरीरामध्ये, जेथे आम्ही त्याला पाहू.” अब्राहामाने तेच पाहिले.

160 आता लक्ष द्या. आपण पाहतो ते कसे बदलले गेले. कलवरीपासून, आपणास त्याच्या गौरवाचे भागीदार होण्यासाठी आमंत्रित केले आहे. आता, पहिले करिंथकरांस पत्र 12 मध्ये म्हटले आहे, “त्याच्या शरीरामध्ये आपला बाप्तिस्मा झाला आहे. एका आत्म्याने आपला सर्वांचा बाप्तिस्मा झाला आहे.” एका “पाण्याने” नव्हे. “एका आत्म्याने, आपणा सर्वांचा बाप्तिस्मा झाला आहे.” ते बरोबर आहे, आता, आणि तर आपण त्याचे भाग आहोत.

161 माझी आशा आहे की मी तुम्हाला खूप वेळ थांबवत नाही. [मंडळी म्हणते, “नाही,”—सम्पा.] समजले? मी आशा करतो मी थांबवत नाही.

162 परंतु हे अगदी एका महान संगीत कार्यक्रमासारखे आहे जे वाजविले जाते, किंवा नाटकामध्ये भूमिका केली जाते.

163 मी संगीत कार्यक्रम किंवा नाटकाविषयी अधिक जाणत नाही. परंतु मी हे नाटक पाहत होतो...मी *कारमेन* विषयी बोलत होतो, जे माझी मुलगी आणि ते त्यात होते. आणि ते—आणि ते ह्या संगीत नाटकात *कारमेन*मध्ये भूमिका करत होते. ते भूमिका करत होते. संगीतही त्याच गोष्टीची भूमिका करत होते.

164 तशाच प्रकारे ते आहे, जेव्हा तुमचा ख्रिस्तामध्ये, पवित्र आत्म्याद्वारे बाप्तिस्मा होतो.

165 आता, पहा, तुमच्यातील पुष्कळ जणांनी थोर रशियन रचनाकाराची गोष्ट वाचली किंवा ऐकली आहे, ज्याने *पीटर आणि लांडगा* ही गोष्ट रचली आहे. आणि कसे तो, त्यांनी त्या झांझर आणि सर्वांवर भूमिका केली आहे आणि ज्यांना ही गोष्ट ठाऊक आहे, जे ही कागदावर वाचू शकतात, आणि संगीत नाटकात ऐकू शकतात, ते कसे नाटकात भूमिका करीत आहेत, वाजवत आहेत, का, त्यांना प्रत्येक बदल कळतो. ते *येथे* ते पाहू शकतात आणि बदल समजू शकतात.

166 परंतु, आता, काय होईल जर—जर रचनाकार काहीतरी लिहीतो, आणि आपल्याला आढळते की त्याची भूमिका योग्यरितीने केली गेली नाही? तेव्हा आपल्याला समजते की तेथे काहीतरी आहे जे घडते तेथे कसलीतरी कमतरता आहे, जेव्हा आपण त्यांना पाहतो, ज्याने ती रचली आहे, बनवली आहे आणि लिहीली आहे, आणि नंतर संगीत वाजवले आहे, चूकीचा सूर लावला आहे. तेथे काहीतरी चूकीचे आहे. दिग्दर्शकाने चुकीच्या हालचाली दिलेल्या आहेत. समजले.

167 आणि आज तेच महत्त्वाचे आहे, माझ्या लूथरन बंधूनो, माझ्या बाप्तिस्ट बंधूनो, माझ्या पेंटेकॉस्टल बंधूनो. सर्व निरनिराळ्या संप्रदायातील माझ्या बंधूंनो, हेच ते आहे. समजले? तुम्ही तो सुर देण्याचा प्रयत्न करता जो लुथरच्या दिवसात दिला होता, वेस्ली तशासारखे जेव्हा...प्रत्यक्षात, संगीताचे पत्रक येथे दाखवते की तो दुसरा समय आहे. समजले? समजले? समजले? आपण लूथरच्या प्रकाशात जगू शकत नाही; तो एक सुधारक होता. आपण त्याच्या कार्याची दाद देतो, परंतु आपण ती—ती भूमिका पार पाडली आहे. आपण *येथे* पुढे आता पुस्तकाच्या मागे आलो आहोत. समजले? आपण—आपण त्यासारखे वागू शकत नाही.

168 आता, एकच मार्ग आहे जो तुम्हाला ते करण्यास समर्थ करील, माझ्या बंधूंनो, तो हा आहे, आणि जगातील बंधूजनहो, जगातील निरनिराळया भागातील, बंधुजनहो, मी सांगू शकतो, तेथे फक्त एकच मार्ग आहे जो—जो दिग्दर्शकाने करावा. त्याला त्याच आत्म्यामध्ये जावे लागेल. जो रचनाकारामध्ये होता, तेव्हा त्याला ते प्राप्त करता

येईल आणि जेव्हा मंडळी, स्वतः संगीत माला असेल, जेथे जग ही चिन्हे आणि अद्भूते पाहील; जेव्हा मंडळी, आणि रचनाकार, आणि दिग्दर्शक, ते सर्व रचनाकाराच्या आत्म्यामध्ये येतील.

169 तेव्हा जेव्हा ते म्हणतात, "चमत्काराचे दिवस भूतकाळात गेले," तो योग्य सूर देत नाहीत.

170 परंतु जेव्हा ते खऱ्या सुरात येतात, आणि खऱ्या आत्म्यामध्ये येतात, तुम्ही हे कसे करणार आहात जोपर्यंत रचनाकाराचा आत्मा खाली येत नाही? आमेन. तेव्हा जेव्हा तुम्ही म्हणाला, "चमत्काराचे दिवस कधीच समाप्त झाले नाहीत," संगीतमाला बोलेल, "आमेन!" जेव्हा आम्ही एका सूरात येऊ, म्हणू, "येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे." संगीतमाला म्हणेल, "आमेन!" पवित्र आत्मा तुम्हावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल तेव्हा संगीतमाला म्हणेल आमेन मला समजले! माझ्याकडे ते आहे! तेथे त्याविषयी अंदाजाचे कार्य नसणार. पूर्ण संगीतमाला वचनाच्या सुसंवादात असेल. ते…[भाऊ ब्रॅन्हम तीन वेळा टाळ्या वाजवतात—सम्पा.] तेच आहे. ओह! ही उत्कृष्ट गोष्ट आहे. दिग्दर्शक आणि रचनाकार एकाच आत्म्यामध्ये असले पाहीजे. आणि तशाच प्रकारे संगीतकार ही त्याच आत्म्यामध्ये असले पाहीजे, ह्यासाठी की योग्य भूमिका करावी. आणि जग आश्चर्य करील की काय चालले आहे.

171 ते साम्यवादाविषयी बोलतात, आणि मला बरे वाटत नाही, आणि हे सर्व एकीकरण आणि इतर सर्वकाही, आणि अलगीकरण. ओह, दया कर! असे हा सर्व मुर्खपणा; जेव्हा प्रभूचे येणे जवळ आहे, तेथे काहीतरी अयोग्य गोष्टी होत आहेत. मला भय आहे की दिग्दर्शक…दिग्दर्शक रचनाकाराच्या आत्म्याबाहेर गेला आहे.

172 जेव्हा आपल्याला रचनाकाराचा आत्मा मिळतो, ते देवाचे मूळ सामर्थ्य ज्याविषयी बायबल म्हणते, "प्राचीन पुरुष हे बायबल लिहीण्यासाठी पवित्र आत्म्याने चालविले गेले," तुम्ही पहाल ते दोन चीनी कागदाचे तुकडे एकत्र जुळतील, तशाच प्रकारे देवाचे बायबल आणि एक विश्वासी एकत्र येतील, कारण ते दोघेही एकाच आत्म्यामध्ये आहेत. ते दोघेही समान आहेत. ते भिडस्तपणे सरळ एकत्र येतात. आज आपल्याला ज्याची गरज आहे ते म्हणजे दिग्दर्शक. ते खरे आहे, पुन्हा वचनाकडे या, परत आणि त्यावर विश्वास ठेवा जसे त्यात म्हटले आहे. तेव्हा तुम्ही स्वतः देवाला पाहता. तेच प्रगट करणे आहे. ते नाटक वास्तविक बनले जाते.

173 आज ते म्हणतात, "बरे, तो एक ऐतिहासिक देव आहे. आम्हाला ठाऊक आहे की त्याने तांबडा समुद्र पार केला. त्याने हे सर्व केले आहे. आणि तो त्या—त्या अग्नीच्या भट्टीत त्या इब्री मुलांसह होता." त्या ऐतिहासिक देवामध्ये काय चांगले आहे, नाही का, जर तो आजही सारखा नाही? मनुष्य आजपर्यंत देवाचे गौरव करीत आला आहे जे त्याने त्याच्यासाठी केले आहे. हा विचार करीत की तो काय करील, आणि ह्याकडे दुर्लक्ष करुन की तो काय करीत आहे. ते केवळ मनुष्यामध्ये आहे की त्याने ते करावे. आणि आजही तीच गोष्ट आहे, माझ्या बंधुजनहो. तीच गोष्ट आज आहे. ओह, माझ्या देवा!

174 आपण परत जाऊया आणि संगीतमाला योग्यरितीने वाजवूया, जेथे जे जगाचे आहेत ते पाहू शकतील. येशूने म्हटले, "जर मला तुम्ही पृथ्वीपासून उंच कराल, तर मी सर्व मनुष्यांना माझ्याकडे आकर्षित करीन." आणि, "तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे."

175 दिग्दर्शक, संगीतकारासह आणि रचनाकारासह योग्य आत्म्यात येऊ द्या, सर्व गोष्टी बरोबर होतील. तेव्हा आपल्याकडे, त्या विषयावर अनुमान कार्य होणार नाही, तेव्हा आपण

त्याच्याबरोबर ओळखले जाऊ. इब्री 13:8 म्हणते, "तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे."

176 आपण त्याच्यासह प्रेषित 2 प्रमाणे ओळखले जाऊ. आपण त्याच्याबरोबर त्याच बाप्तिस्म्यासह, त्याच गोष्टीसह ओळखले जाऊ. त्या काळी तो सर्व होता आणि तो सर्व आहे. तो सर्व होता आणि तो सर्व आहे, आपण तेथे अगदी त्याच्यासारखे आहो.

177 अगदी तसेच जर मी एक खरा अमेरिकी होऊ इच्छितो, मला त्या प्रत्येक गोष्टींबरोबर ओळख करुन घ्यावी लागेल जी ती होती, जी ती आहे. मला त्यासह ओळख करुन घ्यावी लागेल, जर मी एक खरा अमेरिकी आहे.

178 जर मी एक खरा अमेरिकी आहे, तर मी प्लेमाऊथ खडकावर उतरलो आहे. आमेन. मी केले आहे, जर मी एक अमेरिकी आहे. तसेच तुम्हीही केले आहे, तुम्ही त्या प्लेमाऊथ खडकावर प्रवासी पुर्वजांबरोबर उतरला आहात. त्या प्लेमाऊथ खडकावर, जेव्हा ते आले, मी त्यांच्याबरोबर होतो; तसेच तुम्ही सर्वजणही होता.

179 मी पॉल रिवरवर घोडेस्वार होतो, अगदी त्या रस्त्यावर, ह्यासाठी तिला धोक्याची सुचना द्यावी हे अगदी बरोबर आहे.

180 येथे वॅली फोर्जवर, बर्फाळ डेलावेअरला मी पार केले, त्या शिपायांच्या समुहांसह, ज्यांच्यातील अर्ध्याजणांच्या पायात बुट नव्हती. मी अगोदरच, जॉर्ज वॉशिंग्टनसह संपूर्ण रात्र प्रार्थना केली. मी हदयात एक स्वप्न ठेवून डेलावेअर पार केले. आम्ही अमेरिकी आहोत. होय, महाशय. वॅली फोर्ज येथे, मी निश्चितपणे हे केले.

181 मी मुळ धन्यवाद देणाऱ्या पुर्वजांसह धन्यवाद दिला. मी परमेश्वराला धन्यवाद दिला. जर मी वास्तविक अमेरिकी आहे, तर मी तेथे त्या मेजावर ओळखला गेलो आहे.

182 जर मी एक खरा अमेरिकी आहे, जेव्हा मी स्टोनवॉल जॅक्सनबरोबर उभा होतो, मी ओळखला गेला होतो.

183 जर मी एक खरा अमेरिकी आहे, तर मी बोस्टन येथे टी पार्टीसह ओळखला गेला होतो. होय, महाशय, जेव्हा आम्ही त्या गोष्टी घेण्यास नकार दिला तेव्हा खोट्या गोष्टींवर भरवसा केला होता. मी खरा अमेरिकी आहे. मी त्या गोष्टींसह ओळखला गेलो. होय, महाशय. ओह, बापरे!

184 मी पहिली स्वातंत्र्याची घंटा, 4 जुलै, 1776 मध्ये वाजवली. मी येथे स्वातंत्र्याची घंटी वाजवली आणि घोषणा केली की आम्ही स्वतंत्र आहोत. एक खरा अमेरिकी ह्या नात्याने, मला ते करावे लागले.

185 मी त्या आंदोलनामध्ये तिच्या लज्जेसहीत ओळखला गेलो, जेव्हा भाऊबंध विरोधात लढले. मला तिच्या लज्जेत तसेच सहभागी व्हावे लागले जसे तिच्या गौरवात मी सहभागी झालो. जर मी एक अमेरिकी आहे, तर मला तसे करावे लागेल. मी तिच्याबरोबर ओळखला गेलो होतो. होय, महाशय.

186 मी गेटीसबर्ग येथे ओळखला गेलो होतो, जेव्हा लिंकनने त्याचे भाषण केले. होय, श्रीमान.

187 मी वेक आयलैंड वर होतो, रक्तबंबाळ सैनिकांसह. मी वेक आयलंड वर उठलो.

गॉमवर, झेंडा फडकवण्यास मदत केली.

188 मी एक खरा अमेरिकी आहे. आमेन. जे सर्व ती आहे, मी ही आहे आणि त्याचा अभिमान आहे. होय, खचित. सर्व अमेरिका जी होती, जी ती आहे, तो मीही आहे, एक

अमेरिकी म्हणून. सर्व गोष्टी जी ती होती, मी ही आहे, कारण मी तिच्यासह ओळखला गेलो आहे.

189 तशीच गोष्ट, एक खरा ख्रिस्ती असण्याद्वारे आहे, तुम्ही त्यासह ओळखले गेले पाहिजे.

190 मी मोशेसह प्रचार केला. आणि...किंवा नोहाबरोबर, आणि लोकांना पुढे येणाऱ्या न्यायाची सुचना दिली; एक खरा ख्रिस्ती असल्याकारणाने.

191 मी मोशेसह त्या अग्नीच्या झुडूपात होतो. मी तो अग्नीस्तंभ बघितला. मी त्याचे गौरव पाहिले. मी मोशेबरोबर त्या वाळवंटात होतो, एक ख्रिस्ती म्हणून. मी एक ख्रिस्ती म्हणून, परमेश्वराच्या सर्व गोष्टीत मी ओळखला गेलो पाहिजे. मी त्याचे गौरव पाहिले. मी त्याची वाणी ऐकली. मला वेगळे करण्याकरिता स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करु नका, कारण मी तेथे होतो. मी जाणतो मी कशाविषयी बोलत आहे. जे घडले ते मी पाहिले आहे.

192 मी तांबड्या समुद्रात होतो, जेव्हा मी देवाचा आत्मा खाली उतरताना आणि समुद्राचे पाणी एका बाजूने दुभंगताना पाहिले. त्या वेळूच्या झुडूपांतून नाही, जे आज ते सांगण्याचा प्रयत्न करतात, परंतु नव्वद फूट समुद्रामधून मी देवाचा आत्मा पाहिला. मी मोशेसह त्या शुष्क जमिनीवरुन चालून तांबड्या समुद्राच्या पलीकडे गेलो.

193 मी सीनाय पर्वताजवळ उभा होतो आणि ढगांचा गडगडाट होताना आणि वीज पडताना पाहिली. मी त्यांच्यासह मान्ना खाल्ला. मी त्या खडकांतून प्यालो. मी आज रात्रीही ते करीत आहे. मी त्या मान्ना खाणाऱ्यांसह ओळखला गेलो होतो. मी त्या खडकांतून पाणी पिणाऱ्यांसह ओळखला गेलो होतो.

194 मी तेव्हाही ओळखला गेलो होतो जेव्हा यहोशवाने तुतारी वाजवली, आणि यरीहोची भिंत खाली पडली.

मी दानीएलासह सिंहाच्या गुहेत होतो.

मी त्या इब्री मुलांसह अग्नीच्या भट्टीत होतो.

मी डोंगरावर...एलियासह कर्मेल डोंगरावर होतो.

195 मी बाप्तिस्मा देणाऱ्या योहानासह होतो, आणि त्या टिकाकारांसमोर होतो. मी देवाचा आत्मा खाली उतरताना पाहीला. मी देवाची वाणी होताना ऐकली. “हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ज्यात राहण्यास मी संतुष्ट आहे.” होय, श्रीमान. मी निश्चितच त्याच्यासह ओळखला गेलो होतो. ते अगदी बरोबर आहे.

196 मी तेथे लाजराच्या कबरेजवळ ओळखला गेलो, जेव्हा त्याने लाजराला उठवले. मी त्या स्त्रीसह विहीरीजवळ ओळखलो गेलो, जेव्हा त्याने तिला तिची पापे सांगितली. होय, श्रीमान.

197 मी निश्चितच त्याच्या मृत्यूत त्याच्यासह ओळखला गेलो होतो आणि पहिल्या इस्टरवर ओळखला गेलो होतो, मी त्याच्याबरोबर मृत्यूतून उठविला गेलो. मी त्याच्या मृत्यूत त्याच्यासह ओळखला गेलो.

198 मी माडीवरील खोलीत त्या एकशे वीस जणांसह होतो. मी त्यांच्याबरोबर ओळखला गेलो होतो. होय! मला—मला धार्मिक असल्यासारखं वाटत आहे. होय, माझ्या देवा! मी तेथे ओळखला गेलो होतो. मी त्यांच्यातील एक आहे. मी तेथे ओळखला गेलो होतो माह्याकडे तोच अनुभव आहे, जो त्यांच्याकडे होता. जेव्हा हे घडले मी तेथे एक खरा ख्रिस्ती म्हणून होतो. मी त्या मोठ्या सुसाट्यासारखा आलेल्या वाऱ्याचा साक्षीदार होतो.

मी तेथे साक्षीदार होतो. मी देवाच्या सामर्थ्याचा अनुभव घेतला. जेव्हा ते हादरले, मी त्यांच्याबरोबर होतो. जे निरनिराळ्या भाषांतून बोलले. मी तेथे आलेल्या अभिषेकाचा अनुभव घेतला. मी त्यांच्यासोबत होतो. मी त्याच्यासह ओळखला गेलो जेव्हा पवित्र आत्मा निरनिराळ्या भाषांतून त्यांच्याशी, बोलू लागला.

199 मी पेत्राबरोबर होतो, जेव्हा त्याने प्रेषित 2 मध्ये समीक्षकासमोर महान भाषण केले. मी त्याच्याबरोबर ओळखला गेलो होतो. होय, श्रीमान.

200 प्रेषित 4 मध्ये, जेव्हा ते एकत्र जमले, मी त्यांच्यासह होतो जेव्हा ती इमारत हादरली. प्रार्थना सभेनंतर, इमारत हादरली जेथे ते बसले होते. मी त्यांच्यासह तेथे ओळखलो गेलो.

मी पौलासोबत ह्या टेकडीवर प्रचार केला. होय, महाशय.

201 मी योहानासोबत पात्म बेटावर होतो आणि त्याचे दुसरे येणे पाहिले.

मी लुथरसोबत सुधारणुकीच्या कार्यात होतो.

202 मी वेस्लीसह होतो, जेव्हा ते पेटलेले लहान लाकूड, त्या आगींतून हिसकावले. जेव्हा ॲग्लीकन चर्च विरुध्द मोठे आंदोलन झाले. मी तेथे त्याच्याबरोबर होतो.

203 आणि तेथे आज रात्री, मी 1964, फिलाडेल्फिया पेनीसीलवेनीयामध्ये, त्याच प्रकारच्या समुहासह, त्याच प्रकारच्या अनुभवासह ओळखला जात आहे. मी एक ख्रिस्ती असल्याकारणाने मला तसे असले पाहिजे. मी तेथे ओळखला गेलो पाहिजे जेथे देवाचे वचन प्रगट केले जात आहे. मी त्या समुहाबरोबर ओळखला जात आहे जे देवाच्या आत्म्याचा अनुभव करीत आहेत.

204 मी त्या समुहाबरोबर ओळखला जात आहे जे जाणतात की तो प्रगट झाला आहे, जे जाणतात तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे, ते जाणतात की हे धर्मवेड नाही. “तो येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे.” मी आज रात्री त्या समुहासह ओळखला जात आहे. तरीही त्यांना बंडखोरांचा समुह, अजूनही धर्मवेड्यांचा समुह, देवाच्या वचनामुळे म्हटले जात आहे. परंतु, “मला येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेची लाज वाटत नाही, कारण तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे,” आणि मी तो आहे. मी त्यांच्यासोबत आहे जे लिखीत पत्र आहेत ज्याविषीयी मी बोललो आहे, सिध्द केलेले आहे, देव मानवी रुपात, स्त्रीया आणि पुरुषांमध्ये झाकलेला आहे. होय!

205 देवाने पुन्हा आपला *मुखवटा* काढून टाकला आहे. तो स्वतःला त्याच्या लोकांमध्ये प्रगट करीत आहे. तो महान राजा ज्याने त्याचे गौरव बाजूला ठेवले. “आता थोडाच वेळ आहे आणि जग मला आणखी पाहणार नाही. मी त्यांच्यासाठी झाकलेला असेन. परंतु तुम्ही मला पाहाल, कारण मी तुम्हाबरोबर असेन, जगाच्या अंतापर्यंत, तुम्हामध्ये असेन, लूथरपासून वेस्लीपर्यंत बदलत आहे, गौरवातून गौरवामध्ये. मी अजूनही तोच परमेश्वर आहे जो जीवंत आहे, आणि त्याच्या मूळ गौरवाकडे परत जात आहे.” हालेलुयाह!

206 त्याने प्रत्येक सांप्रदायिक पडदे फाडले आहेत, प्रत्येक आवाजाच्या अडथळ्यांना तोडले आहे. ते आवाज जे म्हणतात, “होय, तो धर्मवेडेपणा आहे.” ते पूर्णरितीने तोडले आहेत. तो आवाज जो तेथून येतो. म्हणतो, “ओह, ती लोकं वेडी आहेत.” त्याने तो पडदा पूर्णपणे फाडला आहे. होय, त्याने केले आहे. “ओह, तुम्ही ते करु शकत नाही. तुम्ही कोणीच नाही. केवळ धर्मवेड्यांचा समुह आहात.” त्याने तो पूर्णतः तोडला आहे. “दिव्य आरोग्य अशी काही गोष्ट अस्तित्वात नाही.” त्याने ती पूर्णतः तोडून टाकली आहे.

ओह, माझ्या देवा, कारण त्याचे वचन सांगते, तो ते करील. तुम्ही देवाच्या वचनाला जिंकू शकत नाही.

207 आणि अजूनही, तो आज रात्री, तो सामर्थी विजय मिळविणारा येथे उभा आहे, कारण त्याने प्रत्येक मेथडिस्ट, बाप्तिस्ट, प्रेसबेटेरियन, प्रत्येक प्रकारचे पडदे फाडले आहेत. तो आज रात्री त्याच्या लोकांमध्ये उभा आहे, जे रितीरिवाजाने जिंकले गेले नाही. लोकांना जे वाटेल ते बोलू द्या, जे वाटते ते करु द्या, जे काही त्यांना वाटते. परमेश्वर त्या आवाजांच्या अडथळ्यांना तोडत आहे.

208 आणि लक्षात ठेवा, ते मला म्हणतात, जेव्हा एक विमान वास्तविकरित्या त्या आवाजांचा अडथळा तोडते, तेव्हा त्याच्या वेगाला काही मर्यादा राहत नाही.

209 मी तुम्हाला सांगत आहे, जेव्हा तुम्ही रितीरिवाजांचे अडथळे तोडता. जे हे म्हणतात की, "येशू पूर्वी होऊन गेला, आणि आता तो नाही," जेव्हा तुम्हाला कळते की तो काल, आज, व युगानुयुग सारखा आहे, तेव्हा तेथे मर्यादा उरत नाही की देव अशा सभांमध्ये येथे काय करु शकतो, आणि आणि जगाला दाखवतो की त्यांना कसली गरज आहे: जगातील जत्रा नाही, परंतु एक विश्व संजीवन जे जीवंत देवाच्या उपस्थितीने भरलेले व बाप्तिस्मा घेतलेले असेल. *मुखवटा* काढून स्वतःला मानवी देहात प्रगट करीत आहे. हालेलुयाह! मी त्यावर विश्वास करतो.

210 प्रत्येक अडथळा, प्रत्येक पडदा, त्याने तोडला आहे! त्याची उपस्थिती कोणीही लपवू शकत नाही. जेव्हा लोक आपल्या हृदयात भूकेले होतात, तेव्हा तेथे एक पडदा आहे, जो फाडला जाण्यास तयार आहे. तुम्ही केवळ त्यावर अवलंबून राहू शकता. त्याच्या महान पवित्र आत्म्याने, प्रत्येक पडदा फाडा!

211 आणि आज रात्री, येथे, तो सामर्थी विजय मिळविणारा उभा आहे, काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे, आजाऱ्यांना बरे करीत आहे, विश्वासणाऱ्यांस बाप्तिस्मा देत आहे, जसे त्याने नेहमी केले आहे. तो सामर्थी विजय मिळविणारा आहे. दुर्दैवी सैतान पळत आहे. होय, महाशय. ते नेहमीच असतात, जेव्हा तो सभोवती असतो.

212 बंद करताना, मी हे सांगू शकतो. तेथे एक...काही वर्षांअगोदर, मी एक गोष्ट वाचली होती जी एका व्हॉयलीन वादकाची आहे. त्याच्याकडे एक जुने व्हॉयलीन होते ते तो विकणार होता. तुम्ही ही गोष्ट, खूप वेळा ऐकली आहे. आणि ते ती काही विशेष गोष्टीसाठी विकणार होते, आणि लिलाववाला म्हणाला, "कोण मला *इतके–इतके* देईल?" मला वाटते त्याला काही नाणी, कदाचित पन्नास सेंटस किंवा असेच काही. "एक झाला, दुसरा झाला..."

213 एकदम थेट, एक व्यक्ती मागे उभा राहिला. त्याने म्हटले, "जरा एक मिनीट" आणि तो गेला आणि ते घेतले. कल्पना करुया की त्याने हे वाजवले:

> तेथे एक झरा आहे जो रक्ताने भरला आहे,
> इम्मानुएलच्या नसांतून काढले आहे;
> जेव्हा पापी त्या रक्तामध्ये डुबतात,
> त्याचे सर्व अपराधांचे डाग निघून जातात.

214 तेव्हा जेव्हा त्याने ते खाली ठेवले, तेथे एकही डोळा कोरडा नव्हता. तेव्हा त्याने म्हटले, "कोण किंमत लावील?"

215 एकाने म्हटले, "पाच हजार." "दहा हजार." ते बहुमोल होते. का? त्या—त्या वयस्क व्हॉयलीनच्या गुरूने त्याची खरी गुणवत्ता प्रगट केली.

216 होय, भावा, बहिणींनो, आता ह्या वचनाचा गुरु, ज्याने ते लिहीले आहे तो महान पवित्र आत्मा त्याने आपल्या प्रेमाच्या बाणाने, तो तुमच्या हृदयाच्या आरपार खेचला.

तेथे एक झरा आहे जो रक्ताने भरला आहे.
जो इम्मानुएलच्या नसांतून काढला आहे.

217 तुम्ही त्याची पूर्ण किंमत पहाल, आणि प्रगट केलेल्या देवाला आपल्या दृष्टीसमोर पहाल. तो, अगदी तसाच आहे जसा पेंटेकॉस्टच्या दिवशी, तो लोकांवर आला, जेव्हा त्याने स्वतःला त्यामध्ये *ओतले*, “रिक्त केले.” ते बरोबर आहे.

218 तुम्ही म्हणाल, “भाऊ ब्रॅन्हम, मी प्रयत्न केला आहे. मी प्रयत्न केला आहे, मी *हे*, *ते*, *इतर* केले आहे.”

219 एके दिवशी माझी कार्लसबड, न्यू मेक्सीको येथे सभा होती. आणि आम्ही मोठया जुन्या वटवाघळांच्या गुहेत गेलो. आणि ते एकप्रकारे भीतीदायक दिसत होते, आणि आम्ही तेथे खाली गेलो. आणि एक–एक मनुष्य जेव्हा तो त्या जागी गेला, त्याने—त्याने बत्ती विझवली. आणि, होय, माझ्या देवा, तुम्ही कल्पना करु शकता की तेथे किती अंधार होता. तेथे…तेथे इतका अंधार होता की तुम्ही अनुभव करु शकता.

220 आणि ते बरेचसे तशाच प्रकारे आहे की असा समय येत आहे, जेव्हा आपण मंडळ्यांना पहात आहोत की त्या देवाच्या वचनाला ओळखण्यात अयशस्वी ठरत आहेत; जेव्हा तुम्ही सीयोनेच्या कन्यांना तसेच करताना पहात आहात जसे त्या अगोदर करत होत्या; जेव्हा तुम्ही पाहता की आमचे भाऊ धुम्रपान करतात आणि मद्य पितात आणि—आणि घाणेरडे विनोद सांगतात आणि अशा गोष्टी, आणि अजूनही त्यांच्या ख्रिस्तातील कबूलीला पकडून ठेवण्याचा प्रयत्न करतात. ओह, प्रभू परमेश्वर, हा अंधकार आहे. हा घोर अंधकार आहे.

221 आपण त्याच्या येण्याचे चिन्ह पहात आहोत. तेथे असेल…नेहमी दिवस उगवण्याच्या पूर्वी. घोर अंधकार असतो. तेव्हा पूर्वेचा तारा जयजयकार करीत येतो, आणि पुढे येणाऱ्या गोष्टीची सुचना देतो, आणि पुढे होणाऱ्या गोष्टी दाखवतो. लक्ष द्या.

222 तेथे, जेव्हा त्यांनी बत्ती विझवली, तेथे एक लहान मुलगी होती जी मोठ्याने किंचाळली. आणि तेथे एक लहान मुलगा मार्गदर्शकाच्या बाजूला उभा होता, आणि त्याने त्या मार्गदर्शकाला पाहिले जेव्हा त्याने बत्ती विझवली. आणि ती लहान बहीण बेशुध्द पडण्याच्या अवस्थेत होती. ती ओरडत होती. खाली–वर उड्या मारीत होती. “ओह! पुढे काय होणार आहे? काय मामला आहे? काय मामला आहे?”

223 तुम्हाला ठाऊक आहे तो काय ओरडला? त्याने म्हटले, “बहिणी घाबरु नको, तेथे तो मनुष्य आहे, जो ती बत्ती पेटवू शकतो.”

224 लहान बहिणी, लक्षपूर्वक ऐक, तुला कदाचित वाटेल आपण लहान आहोत आणि थोडेसे आहोत. परंतु, घाबरु नको. तेथे एक मनुष्य आहे जो बत्ती पेटवू शकतो. तो पवित्र आत्मा आहे. तुम्ही त्यावर विश्वास ठेवता का? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.]

225 आपण आपली मस्तके काही क्षणांसाठी झुकवूया. तुम्हाला जास्त वेळ थांबवल्याबद्दल मला क्षमा करा.

226 हे महान स्वर्गाच्या देवा, तू स्वतःला प्रगट करीत आहे, तू स्वतःला उघडीत आहे, तू स्वतःची ओळख देत आहेस, गौरवाचा महान राजा, आज रात्री, ह्या लहान उदाहरणांना घेऊन लोकांच्या अंतःकरणात पडू दे. आणि होऊ दे आम्ही त्या अनावरण झालेल्याला पाहू शकू, जो एक खाली आला आणि मंदिराचा पडदा फाडला; आणि तेव्हा तो पडद्यांतून

बाहेर आला आणि पेंटेकॉस्टच्या दिवशी पुन्हा मनुष्यरुपी पडद्यामध्ये आला, तो सारखाच आहे, गौरवांतून गौरवात बदलत आहे.

227 आणि आता आपण सगळे निसर्गाप्रमाणे कार्य करीत आहोत, पुन्हा परत मूळ बीजाकडे, एका मंडळीतून दुसऱ्या मंडळीकडे. आणि येथे ह्या अंतिम युगात, येथे आपण, पुन्हा मूळ गोष्टीकडे जात आहोत जी पेंटेकॉस्टच्या दिवशी लावली गेली होती, प्रत्येक पवित्र वचन पूर्ण करण्यासाठी. "संध्याकाळच्या समयात प्रकाश आहे आणि जी कार्ये मी करितो ती तुम्हीही कराल," आणि कितीतरी गोष्टी ज्याचे तु तुझ्या वचनात अभिवचन दिले आहे.

228 पित्या, जर येथे कोणी असेल. जो अजून तो पडदा फाडून बाहेर आला नसेल, किंवा जर येथे कोणी असेल जो केवळ त्याची नक्कल करतो जो पडद्यांतून बाहेर निघून आला आहे. पित्या, आजरात्री अनुग्रह कर. त्यांनी हे पहावे की सामर्थी जय देणारा, दया आणि सामर्थ्य ह्यात परिपूर्ण, क्षमा करणारा येथे उभा आहे. पित्या, हे प्रदान कर.

229 आणि आपली मस्तके झुकलेली असता काय कोणी येथे असे आहेत? कितीजण, काय ते म्हणू शकतात, "भाऊ ब्रॅन्हम, मी माझे हात उंचावत आहे. माझ्यासाठी प्रार्थना करा"? तुम्ही तुमची मस्तके झुकविलेली ठेवा, आणि तुमचे हात वर करा, "मी प्रत्येक पडदा तोडू इच्छितो, जोपर्यंत मी सामर्थी जय मिळवणाऱ्याला वास्तवात पहात नाही." देव तुम्हास आशीर्वाद देवो. माझ्या बापा, हातांकडे! वर बाल्कनीत, उजवीकडे? परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो. मागे बाल्कनीत? वर करा...देव तुम्हास आशीर्वाद देवो. वास्तवात प्रामाणिक राहा. डावीकडे? तुमचे हात वर करा, म्हणा, "भाऊ ब्रॅन्हम, मी कदाचित खूप वर्षांपासून ख्रिस्ती असेल, परंतु, वास्तवात, मी कधीच त्या पडद्याबाहेर आलो नाही. मी खरेच ते कधीही केले नाही. माझ्याकडे ते नाहीय जे तेव्हा त्यांच्याकडे होते." आज, आपल्याकडे..."मी गरम पाण्यात लावलेले रोप आहे."

230 एका, फुलाला घ्या जे गरमपाण्यात वाढलेले आहे, तुला ते वाढवावे लागेल, पाळावे लागेल, त्याला शिंपडावे लागेल. पाणी द्यावे लागेल. परंतु ते मूळ रोप जे वाळवंटात उगते; त्याच प्रकारचे फूल, त्या सारखे दिसते; ज्यास पाण्याचा थेंबही मिळत नाही, परंतु त्यावर किडे येत नाहीत. ते मजबूत आहे. ते वास्तविक आहे.

231 काय तुम्ही, तेव्हाच्या ख्रिस्तीत्वाची तुलना आजच्या ख्रिस्तीत्वाशी करु शकता? काय तुम्ही ह्या समुहाची कल्पना करु शकतात, आपण ज्यांना आज ख्रिस्ती म्हणतो, जे ह्या जगात त्या लोकांसमान आहे जे पेंटेकॉस्टनंतर होते; ज्यांना वाढवले गेले, पालनपोषण केले, आणि एका मंडळीतून दुसऱ्या, आणि असे बोलतात जे तुम्हाला आवडत नाही, उभे राहतात आणि बाहेर निघून गेले? आणि होय, काय तुम्ही त्याची कल्पना करु शकता? नाही. काय समस्या आहे? ही पुनर्निर्माण आहे.

232 मायकलअँजेलो, ज्याने मोशेच्या स्मारकाची निर्मिती केली, तुम्ही त्याची नक्कल फार कमी पैशांत करु शकता. परंतु, मूळ?

233 तो ज्याने प्रभूभोजचे चित्र रंगविले, मला वाटते ते मूळ चित्र लाखो डॉलर्सचे असेल, जर तुम्ही ते विकत घेऊ शकता. मला माहीत नाही की ते कोठे आहे. परंतु तुम्ही त्याची प्रतिकृती कमी किंमतीत अंदाजे अठ्ठ्याण्णव सेंट डॉलर्समध्ये विकत घेऊ शकता. तुम्ही करु शकता.

234 आणि आज ते तसेच आहे. एक कमी दर्जाचा ख्रिस्ती, एक प्रतिकृती, एक मंडळीत येणारा आहे, तुम्ही त्याला एका सिगारेटने विकत घेऊ शकता. किंवा एका—किंवा एका पेय्याद्वारे. किंवा, स्त्रीसाठी एका केसकापणयाच्या पद्धतीने किंवा रंगविलेले ओठ, तुम्ही

तिला जगातील फॅशनद्वारे कशानेही विकत घेऊ शकता. परंतु तुम्ही एका खऱ्या ख्रिस्तीला स्पर्शही करु शकत नाही.

235 मी त्याला संपूर्ण रुपात पहात आहे. काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे.

236 अरे, ख्रिस्ती लोकांनो, तुम्ही एक खरे ख्रिस्ती बनु इच्छित नाही का? जर तेथे असा कोणी आहे ज्याने त्याचे हात वर केले नाही, तुम्ही ते कराल का? बरे, मी प्रार्थना करीत आहे. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. ओह, हे चांगले आहे. केवळ त्याकडे पहा.

237 आमच्या स्वर्गीय पित्या, "तुझे वचन विफल होऊन परत येत नाही." तूच तो आहे ज्याने हे अभिवचन दिले आहे. मी केवळ असे म्हणण्यास जबाबदार आहे, की तू ते म्हटले आहेस. मी तुझे वचन केवळ उच्चारित आहे. तू म्हटले आहेस. "जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्यावर विश्वास ठेवतो, त्याला सार्वकालिक जीवन मिळाले आहे." तू ते अभिवचन दिले आहे.

238 आणि, प्रभू, आम्हाला ठाऊक आहे. आमच्याकडे आज त्या प्रतिकृती आहेत, जे म्हणतात की ते विश्वास करतात, परंतु, ते करीत नाहीत. ते दिसत आहे. परंतु, प्रभू, त्यात काही खरेही आहेत.

239 मी प्रार्थना करतो की तू आजरात्री ते प्रदान करशील, की प्रत्येक पुरुष आणि स्त्री, मुलगा किंवा मुलगी महत्त्वाचे नाही की कुठल्या देशाचे आहेत, त्यांचा वर्ण काय आहे, ते कुठल्या मंडळीचे आहेत, हे देवा, त्यांना भर. होऊ दे की त्यांना त्याच येशूचे वास्तविक प्रकटीकरण आज आमच्यामध्ये मिळू दे, जसे ते पेंटेकॉस्टच्या दिवशी होते, जेव्हा त्याने त्याला ह्या युगाकरिता पवित्र आत्म्याद्वारे प्रगट केले. वचनाला पूर्ण होताना पहात आहेत, भविष्यवाण्या होताना पहात आहे!

240 आज जगात ज्या मंडळ्या आहेत, वर्ल्ड कौन्सील चर्च आणि त्यांची तुलना पेंटेकॉस्टच्या अभिवचनाशी करीत आहेत? तेथे मूळीच तुलना होऊ शकत नाही. आपण त्या तिकीटावर आपली घाणेरडे वस्त्रे धुऊ शकत नाही.

241 परंतु, प्रभू परमेश्वरा, जर आम्ही त्या झऱ्याजवळ येऊ, तेथे शुध्दतेचा मार्ग आहे, तेव्हा आमचे अनुभव आणि देवाचे वचन एकमेकांशी जुळतील. तेव्हा, आम्ही आमच्या अधिकाराचा दावा करु शकतो. प्रभू, आजरात्री, ते प्रदान कर, कारण मी हे लोकं तुझ्या हाती समर्पित करतो. पित्या, प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे दे. आम्ही येशूच्या नावाने मागतो. आमेन.

242 देव तुम्हाला आशीर्वाद देवो. मी तुमचा, उभे राहिल्याबद्दल, एवढा वेळ थांबल्याबद्दल खूप आभारी आहे. आणि तुम्हाला 10.10 पर्यंत थांबवल्याबद्दल मला क्षमा करा. मी तुम्हाला सकाळी भेटेपर्यंत परमेश्वर तुम्हाबरोबर असो. मी ही सभा आता, सभापतीला देतो.

***सामर्थ्यशाली परमेश्वर आपल्यापुढे प्रगट झाला*** MAR64-0629

(The Mighty God Unveiled Before Us)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, सोमवारी संध्याकाळी, 29 जून, 1964 साली, पेनसिल्व्हेनिया, फिलाडेल्फियामधील बेलव्ह्यू–स्ट्रॅटफोर्ड हॉटेलमध्ये पूर्ण गॉस्पेल बिझनेस मेनस फेलोशिप आंतरराष्ट्रीय अधिवेशनासाठी, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org